१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, शुक्रवार १५ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२९, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 329, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 15 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com


स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# जैन आंदोलकांवर कारवाई करा राज ठाकरे पहिल्यांदाच बोलले

**मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेने दादरचा कबुतरखाना बंद केल्यावर जैन समाजाने आक्रमक होत आंदोलन केले. पण पोलिसांनी जैन आंदोलकांवर गुन्हे दाखल केले नाहीत. मात्र काल कबुतरखाना बंदीच्या समर्थनार्थ आंदोलन करणाऱ्या मराठी एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामुळे मराठी कबुतरखाना विरोधकांमध्ये प्रचंड संताप आहे. आज पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पहिल्यांदाच या वादाबाबत भूमिका मांडली. ते म्हणाले की, आंदोलनात सुरे वगैरे आणणाऱ्या जैन कार्यकर्त्यांवर कारवाई झाली पाहिजे.**



■ मुंबई

**काल** काल निलेश्वशचंद्र विजय या जैन मुनींनी कबुतरखान्याच्या वादात राज ठाकरे यांनी मध्यस्थी करून तो सोडवावा , असे वक्तव्य केले होते. तो अमान्य करत राज ठाकरे म्हणाले की, कबुतरखान्यासंदर्भात उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. त्याप्रमाणे सर्वांना वागावे लागेल. जैन मुनींनी या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे. उच्च न्यायालयाने कबुतरखान्यांवर बंदी घातली आहे, तर तो निर्णय त्या प्रकारे स्वीकारायला पाहिजे. कबुतरांमुळे कोणते रोग होतात. याबद्दल अनेक डॉक्टरांनी माहिती दिली आहे. कबुतरांना खायला देऊ नये, असे उच्च न्यायालयाने सांगूनही जर कुणी कबुतरांना खायला टाकत असेल तर त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई करणे गरजेचे आहे. धर्माच्या नावावर खायला टाकत असाल तर ते चुकीचे आहे. एकाने खायला टाकल्यानंतर बाकीचेही तसेच करणार. मग उच्च न्यायालय आणि सर्वो च्च न्यायालय हवे कशाला? दादरच्या कबुतरखान्याबद्दल जैनधर्मीयांनी आंदोलन केले, त्यानंतर ही बंदी कायम राहावी यासाठी काल मराठी संघटनेनेही आंदोलन केले. जैन समाजाचे आंदोलन झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करायला हवी होती. पण ती झाली नाही. मंत्री मंगलप्रभात लोढा या प्रकरणात मधे येत आहेत. लोढा हे राज्याचे मंत्री आहेत. ते कुणा एका समाजाचे मंत्री नाहीत. त्यांनी महाराष्ट्राचा आणि न्यायालयाचा मान राखला पाहिजे. आधीच्या आंदोलनात ज्या लोकांनी सुरे वगैरे आणले होते, त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई केली पाहिजे. मराठी माणसांनी केलेल्या आंदोलनावेळी पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केली. सरकारला हवे तरी काय? निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकार सर्व समाजांमध्ये जाणीवपूर्वक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहात का?

» पान ७ वर

# सुप्रीम कोर्टाची तातडीची सुनावणी

## श्वानांबद्दल तळमळ! निकाल सुरक्षित

**राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली, लहान मुलांचे चावे घेऊन त्यांचा जीव घेण्याचे प्रमाण वाढले आणि सर्वोच्च न्यायालयाने स्वत:च या जीवघेण्या परिस्थितीची दखल घेत सुनावणी घेतली. खंडपीठाने निर्णय दिला की, दिल्ली आणि परिसरातील सर्व भटक्या कुत्र्यांना सात दिवसांत उचलून दूर शेल्टर होममध्ये ठेवा आणि त्यांना परत आणू नका. मात्र हा निर्णय येताच श्वानप्रेमींचा जीव तळमळला. या निर्णयाविरोधात ताबडतोब याचिका तर दाखल झालीच, पण सर्वोच्च न्यायालयाने त्याला उच्च प्राधान्य देत एका दिवसात तीन सदस्य खंडपीठ दाखल केले आणि आज न्यायालय सुरू होताच त्यावर सुनावणीही झाली. न्यायालयाने सर्वांची बाजू ऐकून घेऊन निर्णय राखून ठेवला.**

■ नवी दिल्ली

**भारतात** आता गाय, श्वान, कबुतर यांना माणसापेक्षा अधिक महत्त्व येऊ लागले आहे. माणसांना इजा झाली तर दुसरीकडे पाहणारे प्राण्यांसाठी टोकाची पावले उचलत आहेत. दिल्लीत भटक्या कुत्र्यांनी हैदोस घातल्याने सर्वोच्च न्यायालयाचे



न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांनी सुनावणी घेऊन दिल्ली, गाझियाबाद, गुरूग्राम, नोएडा आणि फरिदाबाद या संपूर्ण परिसरातील भटके श्वान यांना शहराबाहेर नेऊन शेल्टरमध्ये न्यावे आणि त्यांना परत आणू नये, असा निर्णय दिला. याची अंमलबजावणी सात दिवसांत पूर्ण करण्याचेही निर्देश दिले. या निकालानंतर श्वान पकड मोहीम सुरू झाली आणि काहींचे अपरिपक्व श्वानप्रेम उफाळून आले. त्यांनी या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात पुन्हा धाव घेतली.

आज त्यावर सकाळीच सुनावणी झाली. न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता, न्या. एम. व्ही. अंजरिया यांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे ही सुनावणी झाली. दिल्ली सरकारतर्फे अ‍ॅड. एस. जे. मेहता, अर्चना पाठक यांनी युक्तिवाद केला. श्वानप्रेमींतर्फे कपिल सिब्बल आणि ए. एम. सिंघवी हे दोन दिग्गज वकील हजर होते.

सरकारी वकील एस. जे. मेहता म्हणाले की, कुत्रा चावल्याने मुले मरत आहेत. दरवर्षी ३७ लाख लोक यामुळे मरत आहेत. दिवसाला १० हजार लोकांना कुत्रा चावतो. कुत्र्यांची नसबंदी केली तरी रेबीज होतो. त्यामुळे या कुत्र्यांना शेल्टर होमला हलविलेच पाहिजे. यावर अ‍ॅड. कपिल सिब्बल आणि ए. एम. सिंघवी म्हणाले की, कुत्र्यांना शेल्टर होममध्ये पाठविण्याचा निर्णय स्थगित करा. याचे कारण पालिकेने शेल्टर होम उभारलेलेच नाहीत. आताच कुत्र्यांना

» पान ७ वर

# बीडीडी पुनर्विकासाचा पहिला टप्पा! रहिवाशांना चाव्या सुपूर्द

**५०० चौ. फुटांचे २ बीएचके घर मिळणार**

■ मुंबई

**वरळीतील** बहुप्रतिक्षित बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील चावी वाटप सोहळा आज पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रातिनिधीक १६ रहिवाशांना घरांच्या चाव्या देण्यात आल्या. उर्वरित ५४० रहिवाशांना म्हाडा १८ ऑगस्टला चाव्या दिल्या जाणार आहेत.

वरळी, नायगाव आणि ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी



चाळींचा पुनर्विकास म्हाडामार्फत सुरू आहे. पुनर्विकासानंतर रहिवाशांना ५०० चौरस फुटांचे २ बीएचके अत्याधुनिक घर मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात इमारत क्र. १ मधील 'डी' आणि 'ई' विंगमधील रहिवाशांना आज चाव्या देण्यात आल्या. पुनर्वसन घरांमध्ये व्हिट्रीफाईड टाईल्स, ग्रॅनाईट स्वयंपाकाचा ओटा, अ‍ॅल्युमिनियम फ्रेमच्या खिडक्या, ब्रँडेड

» पान ७ वर

# शिवसेना पक्ष व चिन्हाची सुनावणी पुन्हा पुढे ढकलली

■ नवी दिल्ली

**शिवसेना** पक्ष व चिन्हाच्या मालकीच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात २० ऑगस्ट रोजी सुनावणी होती. मात्र ती पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. आता ८ ऑक्टोबर रोजी सुनावणी होणार आहे.

राष्ट्रपती व राज्यपाल यांच्या वादात राष्ट्रपतींनी मागवलेल्या सल्ल्यावर सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाने घटनापीठ स्थापन केले असून, त्यात न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा समावेश आहे. घटनापीठाची सुनावणी १९ ऑगस्टपासून १० सप्टेंबरपर्यंत होणार आहे.

# पंतप्रधान म्हणून आज मोदी १२व्यांदा फडकवतील तिरंगा

■ नवी दिल्ली

**देशाचा** ७९वा स्वातंत्र्यदिन उद्या उत्साहात साजरा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील लाल किल्ल्यावर सलग १२व्यांदा तिरंगा फडकावून राष्ट्राला संबोधित करतील. यावेळीचा विषय नवीन भारत हा आहे. यावर्षीच्या समारंभात पहिल्यांदाच ११ अग्निवीर राष्ट्रगीत वाजवणाऱ्या बँडमध्ये सहभागी होतील. यावर्षीच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात ऑपरेशन सिंदूरच्या यशाचा लोगो झळकणार आहे. राष्ट्रध्वज फडकवताना राष्ट्रीय ध्वजरक्षक दलात लष्कर, नौदल, हवाई दल, दिल्ली पोलिसांचा प्रत्येकी १ अधिकारी आणि इतर ३२ रँकचे १२८ जवान सहभागी होतील.






# १७ ऑगस्टपासून काँग्रेसची मतदार अधिकार यात्रा

■ नवी दिल्ली

**देशातील** मतदार यादीतील अनियमितता, मतचोरी आणि बोगस मतदानाच्या विरोधात काँग्रेस १७ ऑगस्टपासून वोटर अधिकार यात्रा सुरू करणार आहे.

यासंदर्भात लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एक्स पोस्ट केली. पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये भारत जोडो व भारत न्याय यात्रेच्या दृश्यांसह जन जन अधिकार, घर घर अधिकार या संदेशाचे संगीत आहे. राहुल गांधी यांनी एक्सवर लिहिले की,

» पान ७ वर

# वगळलेल्या ६५ लाख नावांची यादी आयोग वेबसाईटवर प्रसिध्द करणार

■ नवी दिल्ली

**बिहारमधील** वगळण्यात आलेल्या ६५ लाख मतदारांची यादी जिल्हानिहाय वेबसाईटवर प्रसिध्द करण्यास अखेर आज निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सहमती दर्शवली. मात्र, आजची सुनावणी अपूर्ण राहिली असून, येत्या शुक्रवारी पुढील सुनावणी होणार आहे.




बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणुकांच्या आदेशाने सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्परिक्षणावरून (एसआयआर) मोठा राजकीय वाद सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या या एसआयआरच्या विरोधात अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांवर न्या. सूर्यकांत आणि न्या. ज्योयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर नियमित सुनावणी सुरू आहे. एसआयआरच्या नावाआड केंद्र सरकार मतदारयाद्यांमध्ये वारेमाप फेरबदल करत आहे. आपल्या सोयीची नावे याद्यांमध्ये ठेवून विरोधी पक्षांना जास्त मतदान होत असलेल्या विभागांमधून मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जात आहेत.

» पान २ वर

# टाटा पॉवर कंपनी विरोधात आजपासून उपोषण आंदोलन

**अन्यायकारक वागणुकीमुळे कामगार संतप्त**

■ कराड

**सातारा** जिल्ह्यातील माण तालुक्यातील पळसावडे गावात टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड कंपनीविरोधात स्थानिक कामगार संतप्त झाले आहेत. कंपनी कामगारांना अन्यायकारक वागणूक देत असल्याच्या निषेधार्थ या कामगारांनी उद्या १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

या कामगारांनी आंदोलनाचा पावित्रा घेतला असून, उद्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनापासून सामाजिक कार्यकर्ते महेश करचे यांच्या नेतृत्वाखाली उपोषण आंदोलनाचा इशारा दिला आहे. भूमिपुत्र व प्रामाणिक कंपनी कामगार शिवाजी जाधव यांना कोणतेही ठोस कारण न देता नोकरीवरून कमी केले आहे. याशिवाय अनेक कामगारांना पगारवाढ, आरोग्य विमा आणि सामाजिक सुरक्षेच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. सुरक्षा रक्षकांना गेल्या ३ वर्षांपासून पगारवाढ मिळालेली नाही, सहाय्यक कामगार आयुक्तांच्या उपस्थितीत दिलेल्या लेखी आश्वासनांची पूर्तता झालेली नाही.

तसेच आरोग्य विमा, आरोग्य सुविधा किंवा सामाजिक सुरक्षा लाभ दिले गेलेले नाहीत, अशी कामगारांची तक्रार आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते महेश करचे यांनी यासाठी पुढाकार घेऊन कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

# उबाठा-मनसे एकत्र येताच बेस्ट पतपेढीची चौकशी होणार

■ मुंबई

**उबाठा-मनसे** एकत्र येऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्याची शक्यता आहे. याचा पहिला प्रयोग बेस्ट कर्मचारी सहकारी पतपेढीच्या निवडणुकीत होणार आहे. मात्र, ही निवडणूक एकत्र लढवण्याचे उबाठा-मनसेचे ठरताच या पतपेढीच्या कारभाराची चौकशी होणार आहे. या पतपेढीतील काही सभासदांना सहकार विभागाकडून नोटीस पाठवण्यात आली आहे. बेस्ट कर्मचारी सहकारी पतपेढीच्या निवडणुकीत उत्कर्ष पॅनेलअंतर्गत उबाठा आणि मनसे एकत्र आले आहेत. ही निवडणूक १८ ऑगस्ट रोजी होणार आहे. मात्र, निवडणुकीपूर्वीच सहकार विभागाने २०२४-२५

» पान ७ वर

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मोलकरीण, टिफिन सेवा, छोटा व्यवसाय वा नोकरी करणाऱ्यांसाठी घरबसल्या नोकरी. 7738447003 {NC251923}

इमिटेशन ज्वेलरीसाठी मुली पाहिजे. 7023506405 {NC251922}

9869028742 घरी जेवणाकरिता बाई पाहिजे ग्रान्ट रोड ईस्ट मुंबई नं.8 {NC251932}

अर्धवेळ काम- ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, पोलीस व इतर निवृत्तांसाठी : 9821239057 {NC251969}

दादर पश्चिम येथे व्हेज रेस्टॉरंटमध्ये कचोरी, सामोसे, गुलाबजामुन, जिलेबी इत्यादि बनविण्यासाठी अनुभवी कारागीर पाहिजे. आकर्षक वेतन + रहाण्याची, जेवणाची सोय संपर्क - 9920554744 {NC251967}

बारावी पास मुले पाहिजेत बाहेरील कामासाठी वय 19 ते 33 विरार ते भाईंदर राहणारे 9969725362 / 9833911797 {NC251912}

मालाड वेस्टमध्ये इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क : 9819123920 {NC251858}

पेस्ट कंट्रोल कंपनी मुंबई, ठाणे, डोंबिवली करिता टेक्निशियन, टेली कॉलर, सेल्समन आणि लायसन्स ऑफिसर, ऑपरेटर पाहिजेत : 9323682041 आकर्षक वेतन. {NC251959}

कांदिवली (वेस्ट) ऑफिसमध्ये स्टोक हेंडलिंग करण्यासाठी मुली तसेच डिलीव्हरीकरिता मुले/मुली पाहिजेत (वय 40 पर्यंत) 9820181545 {NC251970}

भांडूप इंडस्ट्रियल, मॅक्सिमा प्रिंट पॅकेजिंग एजन्सीला त्वरित स्टाफ पाहिजे. अनुभव 1/2 वर्ष. मार्केटिंग सेल्स पर्सन, प्रोडक्शन कोर्डिनेटर, DTP ग्राफिक डिझाइनर, डिजिटल मार्केटिंग, अकाउंट्स, बाईंडर कटर, स्कूटर येणारा पॅकिंग-डिलिव्हरी हेल्पर. व्हॉट्सअप 9152377195, 7715809224 {NC251956}

### जाहिरातदारांना सुचना

शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी गोपाळकालानिमित्त दै.'नवाकाळ'चा जाहिरात विभाग बंद असल्याने रविवार दि. १७ ऑगस्ट आणि सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५च्या जाहिराती शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत 'नवाकाळ' कार्यालयात स्वीकारल्या जातील. याची जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.
advertise@navakal.in
- मॅनेजर 'नवाकाळ'

## पाहिजेत

कल्याणमध्ये गव्हर्मेंट इलेक्ट्रीकल कंपनीकरिता सुपरवायझर, वायरमेन,हेल्पर व अकाऊंटट पाहिजेत 8080619999 {NC251945}

हाँगकाँगमध्ये लहान मुलाला सांभाळण्यासाठी व जेवण बनवण्यासाठी बाई पाहिजे 9833432953 {NC251972}

अंधेरीमधील लॉजिस्टिक कंपनीला डिलीव्हरीबॉईज पाहिजेत.पगार 16000/- ते 20000/- वयोमर्यादा 18 ते 32 वर्षे शिक्षण-दहावी. अंधेरी जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य,संपर्क करा - **मॅक्स कुरीयर एन्ड कार्गो**,गाळा नं. 28, मखारिया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्सजवळ,अंधेरी (पुर्व) मुंबई-400093 फोन - 9320101188 {NC251971}

दादर पश्चिम येथे सेल्सपर्सनची आवश्यकता.पगार रु.दहा हजार +संपर्क 8850214041 {NC251974}

## Situation Vacant

REQUIRED MALE/ FEMALE OFFICE ASSISTANT (EXCEL & WORD) AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM 8097641616. {NC251963}

## Situation Vacant

Required a Sales & Accounts Helper for Apple Gift at 122/124 Abdul Rehman st. Mumbai 03. Mob. 8879924269 {NC251963}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: 9820627580 / 9820904646 {NC251851}

## नर्सिंग कोर्स

गव्हर्नमेंट मान्यता, 10वी/12वी पास नापास मुले-मुलींसाठी पेशंटकेअर / डिप्लोमा पेशंट केअर/मेडिकल लॅबोरेटरी / DMLT/X-RAY टेक्निशियन / ऑपरेशन थिएटर / Physiotherapy कोर्स करिता संपर्क : Dr. SHRIVASTAV :- 9769116609 / 9702029738 LMP Paramedical Institute. Borivali West {NC251485}

## व्यवसायविषयक

पॅम्पलेट वाटण्यासाठी एक पार्टटाईम माणूस ठेवा आणि लाखो रुपये कमवा. डॉ. महादेव कोकाटे - 9588641225 {NC251964}

छोटी इन्व्हेस्टमेंट आणि प्रत्येक महिना फिक्स इन्कम मिळवा, कायदेशीर व्यवहार, संपर्क साधा :- 8452810618 {NC251968}

घरबसल्या ड्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट - 9028160157 {NC251846}

## वधूवर मेळावा

वधु वर मेळावा सर्वजाती मुलींना फ्री APP कल्याण 9869868620 {NC251837}


# अखेर आरती साठेंसह तिघांची उच्च न्यायालयात नियुक्ती



■ मुंबई

**भाजपाच्या** माजी प्रदेश प्रवक्त्या आणि अधिवक्ता आरती अरुण साठे यांच्यासह ज्येष्ठ वकील सुशील मनोहर घोडेस्वार आणि अजित कडेठाणकर या तिघांची उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने आरती साठे यांची १५ दिवसांपूर्वी या नियुक्तीसाठी शिफारस केली होती. त्याला अनेकांनी विरोध केला. मात्र अखेर काल आरती साठे यांच्यासह तिघांची न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. केंद्र सरकारने काल त्यासंदर्भातील अधिसूचना जारी केली. अतिरिक्त न्यायाधीशांची नियुक्ती दोन वर्षांसाठी असते व त्यांना नंतर कायम केले जाते.साठे या भाजपाशी संबंधित असल्याने ते यांच्या नियुक्तीस काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्यासह अन्य विरोधी पक्षांनी आक्षेप घेवून भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांना हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत तीन वकिलांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव काही काळापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय, न्या. नितीन जामदार आणि न्या. के.आर. श्रीराम यांच्या न्यायवृंदाने २८ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवला होता. मात्र शिफारशींच्या या प्रस्तावावर काहीच निर्णय घेण्यात आला नव्हता. अखेर केंद्र सरकारने काल बुधवारी या तिघांच्या नियुक्तीची अधिसूचना जारी केली. आता या तिघांच्या नियुक्तीमुळे मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची संख्या ६९ इतकी झाली आहे.

# ब्लेंडर्स प्राईडला दिलासा देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली



ब्लेंडर्स प्राईड या प्रख्यात व्हिस्की ब्रँडची मालकी असलेल्या पेर्नोड रिकार्ड कंपनीने जे के एन्टरप्रायझेस या भारतीय मद्यनिर्मिती कंपनीच्या विरोधात दाखल केलेल्या खटल्यात मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. जे के एन्टरप्रायझेस या कंपनीने लंडन प्राईड या नावाने व्हिस्की बाजारात आणली आहे. याला पेर्नोड रिकार्ड कंपनीने आक्षेप घेतला आहे. लंडन प्राईड हे नाव आणि त्याचे डिझाईन ब्लेंडर्स प्राईडची हुबेहुब नक्कल आहे. त्यामुळे जे. के. एन्टरप्रायझेस कंपनीला लंडन प्राईड ही नाममुद्रा आहे त्या स्वरुपात वापरण्यास मनाई करावी, अशी मागणी पेर्नोड रिकार्ड कंपनीने मध्य प्रदेश उच्च न्यायालयात केली होती. उच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावली होती. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या या निकालाला कंपनीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या याचिकेवर आज न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी पेर्नोड रिकार्ड कंपनी जगभरात प्राईड या शब्दावर मालकी हक्क सांगू शकत नाही. कंपनीची नाममुद्रा ब्लेंडर्स प्राईड अशी आहे. हे नाव एकत्रित असल्यासच ती कंपनीची नाममुद्रा ठरते. स्वतंत्रपणे प्राईड हा शब्द कोणालाही वापरता येतो, असे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

# वगळलेल्या ६५ लाख नावांची यादी आयोग वेबसाईटवर प्रसिध्द करणार

पान १ वरून

हयात माणसाला मयत दाखविले जात आहे, असे असंख्य आक्षेप या याचिकांमधून घेण्यात आले आहेत.

आज झालेल्या सुनावणीदरम्यान विरोधकांनी उपस्थित केलेल्या अनेक मुद्यांवर खंडपीठाने निवडणूक आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केली. वगळलेल्या ६५ लाख नावांची यादी सर्व संबंधितांपर्यंत पोहोचेल, अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. आपले किंवा आपल्या कुटुंबातील सदस्याचे नाव मतदार यादीत आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सर्वसामान्य जनतेला राजकीय पक्षांवर अवलंबून राहावे लागता कामा नये, असे न्यायालयाने याप्रसंगी निक्षून सांगितले. त्यावर आयोगाने वगळलेल्या सर्व ६५ लाख मतदारांच्या नावांची माहिती जिल्हानिहाय वेबसाईटवर प्रकाशित करण्यास सहमती दर्शवली.

# किश्तवाडमध्ये पावसाचा कहर ढगफुटीमुळे ३३ जणांचा बळी

■ श्रीनगर

**देशभरात** मान्सूनचा जोर वाढला असून, विविध राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील पद्दार उपविभागात आज दुपारी साडेबारा वाजताच्या चाशोटी गावात ढगफुटी झाली. या दुर्घटनेत २ सीआयएसएफ जवानांसह ३३ जणांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले असून, २२० जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. याशिवाय मचैल माता यात्रेच्या मार्गावर २०० ते ३०० यात्रेकरू अडकल्याची भीती आहे. स्थानिक प्रशासन, लष्कर, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकांकडून बचावकार्य सुरू आहे. लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी आपत्तीग्रस्तांना सर्व प्रकारची मदत देण्याचे आदेश दिले आहेत. दिल्ली आणि एनसीआर परिसरातील नोएडा, गाझियाबाद, गुरुग्राममध्ये मुसळधार पावसामुळे पाणी तुंबल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. भारतीय हवामान खात्याने येथे रेड अलर्ट घोषित केला आहे. पावसाची तीव्रता १७ ऑगस्टपर्यंत कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे.



दिल्लीतील कालकाजी परिसरात झाड कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर एकजण जखमी झाला आहे. यमुना नदीची पाणीपातळी २०४.४३ मीटरवर इशारा पातळी जवळ पोहोचल्याने संभाव्य पूरस्थितीचा धोका लक्षात घेऊन प्रशासन सतर्क झाले आहे. इंडिगो व एअर इंडियाने प्रवाशांना लवकर निघण्याचा आणि विमानाची स्थिती तपासण्याचा सल्ला दिला आहे.

# आजचे राशी भविष्य



शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | उत्साहाने कार्यरत राहाल. विवाहास उत्सुक मंडळींना विवाहाचे प्रस्ताव येतील. कार्यक्षेत्रात विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. |
| वृषभ | तुम्ही केलेल्या प्रकल्प अंमलात आणण्यासाठी अधिक खर्च होऊ शकतो. घरात खेळीमेळीचे वातावरण राहील. प्रेमात पूरक प्रतिसाद मिळेल. |
| मिथुन | विविध प्रकारच्या माध्यमातून आर्थिक लाभ प्राप्त होतील. प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी यशस्वी होतील. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कर्क | व्यवसायामध्ये आर्थिक स्थिती चांगली राहील. स्वतःसाठी चैनीच्या गोष्टी खरेदी कराल. भावंडांचे सहकार्य चांगले राहील. |
| सिंह | दूरच्या प्रवासाच्या योजना आखाल. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. नोकरीत सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. |
| कन्या | व्यवसायामध्ये अचानक घडामोडी होऊ शकतात. आर्थिक व्यवहार सावधगिरीने करावेत. वाहनाच्या वेगावर नियंत्रण आवश्यक. |
| तूळ | व्यवसायामध्ये नवीन बदल फायदेशीर ठरू शकतात. विवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल काळ. नोकरीमध्ये काही जबाबदारी स्वीकारावी लागेल. |
| वृश्चिक | नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. वडिलोपार्जित व्यवसायात यश मिळेल. तरुण वर्गाला प्रेमात प्रतिसाद मिळेल. |
| धनु | उत्साहाने कार्यरत राहाल. नवीन मित्रमंडळी जोडली जातील. व्यवसायवाढीसाठी अधिक मेहनत घ्याल. |
| मकर | कामानिमित्त प्रवास घडू शकतो. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील. प्रेमविवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल दिवस. |
| कुंभ | सामाजिक नातेसंबंध चांगले राहतील. तुमच्या निर्णयाचे कौतुक होईल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. |
| मीन | कुटुंबीयांसाठी अधिक खर्च कराल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील. जोडीदाराचे सौख्य चांगले राहील. |

## शुभ राशी दि. १५/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ८ | २ | ७ |
| ८१ | २८ | ७३ |
| ८६ | २८ | ७८ |
| १८९ | १२९ | २६९ |
| २६० | ६७९ | ३६८ |

## महाराष्ट्र राज्य लॉटरी – महाराष्ट्र गणेशलक्ष्मी – रक्षा बंधन विशेष मासिक सोडत

तिकीट किं. रु. 100/- • सोडत क्रमांक 08 • सोडत दिनांक 14/08/2025

| मालिका | GS-00 | GS-01 | GS-02 | GS-03 | GS-04 | GS-05 | GS-06 | GS-07 | GS-08 | GS-09 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 22 लाख | - | - | 2165 | - | - | - | - | - | - | - |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 9000/- (₹ 9 हजारची 9 बक्षिसे) | 2165 | 2165 लॉटरी भांडार - नागपूर | - | 2165 | 2165 | 2165 श्री एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 2165 | 2165 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर | 2165 | 2165 चंद्रन लॉटरी एजन्सिज, अमरावती |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 10000/- | 6324 | 7239 | 8114 | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 0013 | 1003 | 1798 | 1931 | 3053 | 4183 | 7058 | 8259 | 8640 | 8773 |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 0306 | 0788 | 1751 | 2003 | 2610 | 2779 | 3979 | 4978 | 6404 | 8971 |
| पाचवे बक्षिस रु. 1000/- | 1250 | 3366 | 3884 | 4076 | 5218 | 5515 | 5647 | 7430 | 8907 | 9479 |
| सहावे बक्षिस रु. 500/- | 1063 | 4174 | 5909 | 6145 | 6993 | 7381 | 8226 | 8911 | 9141 | 9422 |

आजच्या सोडतीत रु. 10000/- ची अंदाजित 14 बक्षिसे जिंकली

रु.250/- (सर्व मालिकांसाठी) – सातवे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1623 | 2299 | 2992 | 3913 | 4909 | 5522 | 6168 | 6876 | 7723 | 8565 | 9309 |
| 0053 | 0796 | 1651 | 2312 | 3020 | 3938 | 4920 | 5527 | 6173 | 6961 | 7736 | 8582 | 9347 |
| 0059 | 0801 | 1667 | 2321 | 3030 | 4154 | 4942 | 5548 | 6180 | 7050 | 7767 | 8583 | 9365 |
| 0063 | 0856 | 1715 | 2355 | 3101 | 4172 | 4944 | 5552 | 6226 | 7074 | 7770 | 8595 | 9367 |
| 0077 | 0943 | 1719 | 2390 | 3103 | 4184 | 4950 | 5584 | 6242 | 7103 | 7775 | 8624 | 9386 |
| 0095 | 0991 | 1776 | 2412 | 3187 | 4245 | 4960 | 5589 | 6255 | 7120 | 7777 | 8666 | 9388 |
| 0104 | 1014 | 1786 | 2422 | 3233 | 4274 | 4971 | 5590 | 6356 | 7124 | 7797 | 8698 | 9419 |
| 0109 | 1034 | 1818 | 2459 | 3235 | 4360 | 4972 | 5595 | 6382 | 7157 | 7820 | 8789 | 9492 |
| 0114 | 1041 | 1824 | 2484 | 3244 | 4400 | 5065 | 5659 | 6443 | 7176 | 7826 | 8802 | 9496 |
| 0163 | 1045 | 1835 | 2492 | 3270 | 4404 | 5090 | 5680 | 6456 | 7177 | 7847 | 8804 | 9497 |
| 0189 | 1048 | 1891 | 2524 | 3310 | 4410 | 5096 | 5751 | 6475 | 7197 | 7930 | 8817 | 9509 |
| 0268 | 1118 | 1897 | 2554 | 3325 | 4423 | 5104 | 5758 | 6539 | 7244 | 7956 | 8826 | 9537 |
| 0334 | 1145 | 1943 | 2555 | 3333 | 4430 | 5116 | 5759 | 6566 | 7365 | 7975 | 8835 | 9612 |
| 0369 | 1154 | 1951 | 2572 | 3339 | 4468 | 5149 | 5771 | 6568 | 7495 | 7998 | 8839 | 9648 |
| 0398 | 1160 | 1961 | 2582 | 3359 | 4481 | 5182 | 5821 | 6620 | 7506 | 8034 | 8870 | 9686 |
| 0444 | 1173 | 2002 | 2662 | 3360 | 4531 | 5215 | 5859 | 6641 | 7531 | 8045 | 8911 | 9726 |
| 0478 | 1181 | 2032 | 2708 | 3375 | 4576 | 5232 | 5907 | 6649 | 7549 | 8047 | 8928 | 9791 |
| 0539 | 1303 | 2112 | 2712 | 3395 | 4584 | 5236 | 5913 | 6653 | 7575 | 8065 | 8936 | 9798 |
| 0576 | 1306 | 2113 | 2713 | 3403 | 4595 | 5268 | 5920 | 6656 | 7578 | 8097 | 8941 | 9804 |
| 0604 | 1362 | 2129 | 2718 | 3430 | 4661 | 5296 | 5939 | 6662 | 7584 | 8102 | 8973 | 9806 |
| 0633 | 1428 | 2142 | 2731 | 3515 | 4664 | 5331 | 5954 | 6667 | 7618 | 8181 | 8989 | 9819 |
| 0657 | 1443 | 2163 | 2734 | 3536 | 4688 | 5355 | 5957 | 6679 | 7643 | 8226 | 9016 | 9884 |
| 0669 | 1449 | 2164 | 2758 | 3665 | 4721 | 5358 | 5975 | 6701 | 7669 | 8263 | 9059 | 9889 |
| 0694 | 1512 | 2189 | 2809 | 3694 | 4746 | 5364 | 6078 | 6722 | 7682 | 8305 | 9129 | 9892 |
| 0737 | 1521 | 2199 | 2821 | 3723 | 4772 | 5382 | 6107 | 6726 | 7702 | 8385 | 9172 | 9921 |
| 0739 | 1572 | 2203 | 2822 | 3796 | 4786 | 5421 | 6126 | 6727 | 7707 | 8449 | 9176 | 9923 |
| 0741 | 1599 | 2242 | 2842 | 3810 | 4856 | 5458 | 6128 | 6747 | 7709 | 8486 | 9292 | 9932 |
| 0776 | 1612 | 2273 | 2873 | 3831 | 4894 | 5471 | 6137 | 6798 | 7712 | 8545 | 9294 | 9948 |
| 0779 | 1619 | 2294 | 2926 | 3839 | 4901 | 5498 | 6153 | 6867 | 7721 | 8557 | 9300 | 9961 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 33 • सोडत दिनांक 14/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख – AP-04 : 6930

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- – 5403 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली; महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी; व्यास एजन्सी - जळगाव)

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2213 | 2597 | 3061 | 5331 | 5357 | 5725 | 7500 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1267 | 1785 | 2047 | 2352 | 4816 | 5115 | 5441 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1658 | 2238 | 3363 | 3497 | 4248 | 7230 | 7791 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 4222 | 4914 | 5037 | 6094 | 7068 | 7345 | 7900 |

सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) – सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1918 | 2542 | 3099 | 3617 | 4294 | 4692 | 5252 | 5695 | 6206 | 6629 | 7090 | 7579 |
| | | 1950 | 2579 | 3116 | 3626 | 4320 | 4708 | 5255 | 5700 | 6224 | 6637 | 7104 | 7615 |
| | | 1972 | 2582 | 3133 | 3633 | 4341 | 4712 | 5280 | 5713 | 6230 | 6641 | 7161 | 7623 |
| 1001 | 1330 | 2025 | 2589 | 3135 | 3639 | 4350 | 4772 | 5298 | 5730 | 6261 | 6650 | 7163 | 7631 |
| 1025 | 1391 | 2049 | 2594 | 3193 | 3762 | 4354 | 4780 | 5326 | 5735 | 6265 | 6663 | 7175 | 7639 |
| 1034 | 1396 | 2061 | 2598 | 3229 | 3793 | 4370 | 4791 | 5332 | 5745 | 6269 | 6664 | 7187 | 7702 |
| 1035 | 1402 | 2066 | 2602 | 3230 | 3797 | 4374 | 4794 | 5343 | 5752 | 6306 | 6665 | 7212 | 7703 |
| 1061 | 1404 | 2079 | 2608 | 3233 | 3830 | 4386 | 4796 | 5353 | 5763 | 6318 | 6667 | 7219 | 7726 |
| 1098 | 1411 | 2082 | 2618 | 3236 | 3832 | 4399 | 4844 | 5359 | 5799 | 6329 | 6696 | 7222 | 7733 |
| 1105 | 1413 | 2087 | 2632 | 3238 | 3835 | 4400 | 4855 | 5365 | 5815 | 6338 | 6706 | 7247 | 7734 |
| 1115 | 1428 | 2103 | 2639 | 3243 | 3839 | 4405 | 4865 | 5387 | 5827 | 6354 | 6708 | 7250 | 7748 |
| 1116 | 1431 | 2111 | 2651 | 3309 | 3876 | 4413 | 4884 | 5431 | 5833 | 6360 | 6723 | 7261 | 7749 |
| 1118 | 1433 | 2118 | 2662 | 3311 | 3921 | 4418 | 4926 | 5437 | 5851 | 6363 | 6730 | 7271 | 7761 |
| 1125 | 1452 | 2126 | 2679 | 3312 | 3929 | 4422 | 4932 | 5458 | 5860 | 6367 | 6756 | 7275 | 7762 |
| 1135 | 1489 | 2175 | 2693 | 3327 | 3930 | 4425 | 4933 | 5463 | 5865 | 6376 | 6776 | 7277 | 7763 |
| 1136 | 1498 | 2221 | 2695 | 3330 | 3931 | 4431 | 4947 | 5471 | 5894 | 6378 | 6787 | 7288 | 7770 |
| 1141 | 1511 | 2242 | 2778 | 3331 | 3938 | 4432 | 4948 | 5481 | 5905 | 6381 | 6791 | 7290 | 7772 |
| 1144 | 1521 | 2258 | 2799 | 3332 | 3939 | 4433 | 4960 | 5501 | 5945 | 6401 | 6806 | 7304 | 7773 |
| 1146 | 1556 | 2259 | 2821 | 3345 | 3968 | 4434 | 4981 | 5511 | 5953 | 6411 | 6838 | 7317 | 7786 |
| 1152 | 1591 | 2266 | 2825 | 3350 | 3983 | 4437 | 4988 | 5522 | 5959 | 6412 | 6846 | 7324 | 7789 |
| 1154 | 1601 | 2273 | 2837 | 3360 | 4035 | 4458 | 5008 | 5523 | 5984 | 6440 | 6854 | 7375 | 7797 |
| 1158 | 1615 | 2275 | 2843 | 3363 | 4058 | 4461 | 5013 | 5528 | 5985 | 6444 | 6864 | 7407 | 7799 |
| 1164 | 1618 | 2282 | 2848 | 3373 | 4088 | 4472 | 5020 | 5532 | 5998 | 6446 | 6876 | 7427 | 7807 |
| 1166 | 1659 | 2286 | 2876 | 3398 | 4090 | 4485 | 5036 | 5535 | 6015 | 6463 | 6879 | 7439 | 7810 |
| 1176 | 1666 | 2290 | 2878 | 3403 | 4098 | 4486 | 5051 | 5538 | 6022 | 6476 | 6887 | 7454 | 7861 |
| 1180 | 1729 | 2315 | 2882 | 3424 | 4121 | 4492 | 5054 | 5544 | 6038 | 6491 | 6890 | 7459 | 7870 |
| 1182 | 1742 | 2342 | 2889 | 3446 | 4125 | 4495 | 5087 | 5556 | 6044 | 6499 | 6902 | 7471 | 7873 |
| 1189 | 1767 | 2390 | 2898 | 3461 | 4138 | 4499 | 5090 | 5561 | 6051 | 6503 | 6918 | 7475 | 7874 |
| 1192 | 1801 | 2414 | 2922 | 3487 | 4146 | 4521 | 5095 | 5564 | 6063 | 6515 | 6940 | 7479 | 7887 |
| 1197 | 1811 | 2420 | 2923 | 3506 | 4196 | 4560 | 5096 | 5565 | 6067 | 6531 | 6955 | 7483 | 7890 |
| 1231 | 1814 | 2425 | 2924 | 3522 | 4201 | 4573 | 5107 | 5569 | 6088 | 6556 | 6961 | 7508 | 7898 |
| 1242 | 1815 | 2450 | 2952 | 3523 | 4204 | 4574 | 5130 | 5572 | 6099 | 6563 | 6974 | 7520 | 7930 |
| 1252 | 1817 | 2459 | 2977 | 3526 | 4211 | 4584 | 5153 | 5594 | 6106 | 6596 | 6976 | 7531 | 7946 |
| 1261 | 1836 | 2478 | 3009 | 3529 | 4233 | 4613 | 5155 | 5599 | 6107 | 6607 | 6979 | 7534 | 7951 |
| 1274 | 1881 | 2479 | 3026 | 3530 | 4242 | 4623 | 5170 | 5605 | 6143 | 6610 | 6986 | 7547 | 7970 |
| 1297 | 1901 | 2482 | 3028 | 3534 | 4261 | 4649 | 5209 | 5625 | 6162 | 6613 | 7004 | 7553 | 7972 |
| 1307 | 1908 | 2492 | 3035 | 3535 | 4270 | 4664 | 5218 | 5636 | 6172 | 6616 | 7076 | 7564 | 7979 |
| 1310 | 1913 | 2507 | 3059 | 3570 | 4288 | 4689 | 5230 | 5658 | 6174 | 6617 | 7077 | 7572 | 7984 |
| 1315 | 1916 | 2522 | 3093 | 3604 | 4290 | 4690 | 5243 | 5684 | 6196 | 6622 | 7078 | 7578 | 7997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून व्यवहार करावा ह्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- मॅनेजर, 'नवाकाळ'

## निकाल – गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी) – सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 14/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- – MG-06 : 1835

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0657 | 1491 | 3265 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे) | 5799 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 6503 | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0240 | 0511 | 1225 | 1522 | 2753 | 4415 | 4574 | 6718 | 8655 | 8883 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0583 | 1606 | 1828 | 2357 | 2427 | 2911 | 6564 | 6903 | 7777 | 8994 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0000 | 1095 | 1987 | 3243 | 4240 | 5265 | 6460 | 8028 | 8698 | 9389 |
| 0019 | 1111 | 2258 | 3265 | 4264 | 5324 | 6496 | 8065 | 8702 | 9405 |
| 0059 | 1189 | 2283 | 3310 | 4265 | 5359 | 6593 | 8081 | 8728 | 9430 |
| 0173 | 1201 | 2284 | 3333 | 4269 | 5486 | 6708 | 8095 | 8781 | 9476 |
| 0348 | 1253 | 2445 | 3335 | 4321 | 5520 | 7036 | 8105 | 8813 | 9543 |
| 0480 | 1268 | 2729 | 3353 | 4362 | 5539 | 7327 | 8138 | 8834 | 9549 |
| 0547 | 1411 | 2770 | 3432 | 4397 | 5540 | 7377 | 8159 | 8845 | 9581 |
| 0740 | 1494 | 2832 | 3437 | 4491 | 5541 | 7476 | 8169 | 8859 | 9613 |
| 0747 | 1510 | 2892 | 3484 | 4547 | 5745 | 7486 | 8237 | 8890 | 9623 |
| 0767 | 1616 | 2922 | 3698 | 4583 | 6003 | 7489 | 8247 | 8898 | 9639 |
| 0876 | 1701 | 2928 | 3736 | 4964 | 6066 | 7768 | 8358 | 8990 | 9786 |
| 0954 | 1747 | 2959 | 3737 | 4974 | 6095 | 7879 | 8557 | 9082 | 9883 |
| 1000 | 1866 | 2995 | 3746 | 5047 | 6267 | 7981 | 8606 | 9253 | 9942 |
| 1022 | 1911 | 3019 | 4207 | 5252 | 6271 | 8023 | 8696 | 9290 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल – महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी) – सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 14/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- – GL-03 : 0777

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1636 | 2727 | 2896 | 3283 | 4553 | 5146 | 5381 | 5855 | 7009 | 8878 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0563 | 1208 | 2662 | 7128 | 7464 | 8148 | 8401 | 8675 | 9012 | 9733 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1704 | 3734 | 4311 | 4592 | 4826 | 4949 | 5519 | 6460 | 8097 | 9914 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 1053 | 2028 | 3167 | 4214 | 4848 | 5865 | 6836 | 7595 | 8376 | 8984 |
| 0006 | 1101 | 2065 | 3211 | 4227 | 5056 | 5896 | 6876 | 7675 | 8385 | 8997 |
| 0055 | 1130 | 2072 | 3306 | 4242 | 5099 | 5921 | 6878 | 7689 | 8413 | 9013 |
| 0084 | 1146 | 2161 | 3322 | 4270 | 5124 | 5935 | 6933 | 7699 | 8498 | 9089 |
| 0101 | 1162 | 2192 | 3333 | 4271 | 5205 | 5986 | 6957 | 7711 | 8513 | 9122 |
| 0107 | 1182 | 2244 | 3338 | 4285 | 5252 | 5998 | 6965 | 7719 | 8528 | 9169 |
| 0185 | 1208 | 2252 | 3342 | 4299 | 5304 | 6001 | 7029 | 7736 | 8595 | 9318 |
| 0272 | 1228 | 2339 | 3345 | 4334 | 5337 | 6059 | 7052 | 7754 | 8603 | 9356 |
| 0404 | 1385 | 2375 | 3358 | 4335 | 5352 | 6069 | 7056 | 7795 | 8645 | 9476 |
| 0408 | 1425 | 2382 | 3417 | 4347 | 5354 | 6143 | 7057 | 7816 | 8770 | 9567 |
| 0427 | 1516 | 2391 | 3603 | 4372 | 5393 | 6184 | 7237 | 7822 | 8779 | 9589 |
| 0580 | 1521 | 2394 | 3628 | 4434 | 5480 | 6203 | 7243 | 7873 | 8815 | 9599 |
| 0607 | 1545 | 2478 | 3661 | 4446 | 5502 | 6262 | 7275 | 7953 | 8818 | 9609 |
| 0701 | 1580 | 2562 | 3663 | 4473 | 5509 | 6443 | 7317 | 7966 | 8834 | 9635 |
| 0725 | 1654 | 2584 | 3753 | 4566 | 5521 | 6554 | 7356 | 7979 | 8844 | 9791 |
| 0768 | 1681 | 2748 | 3786 | 4569 | 5556 | 6565 | 7375 | 7987 | 8849 | 9796 |
| 0770 | 1719 | 2923 | 3787 | 4580 | 5575 | 6618 | 7397 | 8127 | 8872 | 9829 |
| 0791 | 1878 | 3008 | 3863 | 4640 | 5675 | 6626 | 7439 | 8135 | 8874 | 9845 |
| 0813 | 1930 | 3032 | 3917 | 4741 | 5711 | 6646 | 7476 | 8148 | 8881 | 9850 |
| 0955 | 1959 | 3083 | 3937 | 4747 | 5816 | 6670 | 7495 | 8182 | 8882 | 9917 |
| 1028 | 1965 | 3113 | 4186 | 4825 | 5855 | 6692 | 7587 | 8274 | 8981 | 9942 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल – महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी • (महाराष्ट्र राज्य लॉटरी) – सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 14/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- – SD-06 : 5615

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1721 | 2276 | 2685 | 3561 | 3716 | 4217 | 4667 | 4792 | 4773 | 5250 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1134 | 1506 | 2072 | 2312 | 3562 | 3637 | 4088 | 4154 | 4281 | 5660 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1029 | 1799 | 2520 | 3385 | 4574 |
| 1091 | 1815 | 2548 | 3495 | 4646 |
| 1228 | 1868 | 2624 | 3553 | 4769 |
| 1327 | 1953 | 2777 | 3770 | 4835 |
| 1365 | 1969 | 2806 | 3829 | 4964 |
| 1390 | 1996 | 2992 | 3968 | 5449 |
| 1425 | 2062 | 3011 | 4108 | 5513 |
| 1525 | 2229 | 3065 | 4250 | 5559 |
| 1594 | 2235 | 3103 | 4424 | 5563 |
| 1619 | 2255 | 3128 | 4426 | 5724 |
| 1647 | 2293 | 3137 | 4479 | 5959 |
| 1661 | 2413 | 3148 | 4566 | 5987 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# माहीममध्ये पालिकेची शाळा वाचवण्यासाठी झेंडावंदन

■ मुंबई - माहीममधील एम. एम. सी. रोडजवळील महापालिकेची ठणठणीत व चांगल्या स्थितीत असलेली शाळा मोडकळीस आल्याचे चुकीचे प्रमाणपत्र देऊन बंद करण्यात आली असून, ती पाडण्याची तयारी सुरू आहे. या शाळेसह महापालिकेच्या इतर शाळा, क्रीडांगणे, उद्याने, इस्पितळ आदींसाठी आरक्षित भूखंड वाचवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या भावना व्यक्त करण्यासाठी स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता शाळेलगत असलेल्या ॲड. देसाई मैदान, भागोजी कीर मार्ग (पॅराडाईज सिनेमाच्या गल्लीत), माहीम पश्चिम येथे नागरिकांच्या वतीने झेंडावंदन कार्यक्रम होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# हिंगोलीत महायुतीत धुसफूस घुगे खंडणीखोर! बांगरांचा आरोप

■ हिंगोली - हिंगोली जिल्ह्यात महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे हे खंडणीसाठी अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करतात, शिवीगाळ करतात असा गंभीर आरोप शिवसेना शिंदे गटाचे नेते आमदार संतोष बांगर यांनी केला आहे. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरीमध्ये काल राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशासनाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संतोष बांगर यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष गजानन घुगे हे अधिकाऱ्यांना धारेवर धरून आपले खिसे भरतात. त्यांना ब्लॅकमेल करतात,असा आरोप केला.


BMS Online वर सुरू • फोन बुकिंग : ९१६७२७५५३०

आज १५ (सुट्टी), दु. ४ अत्रे, कल्याण – ति. वि. दिवसभर

शनि. २३, दुपारी ४ श्री शिवाजी मंदिर, दादर
रवि. २४, सकाळी १०.३० प्र. ठाकरे, बोरीवली
रवि. २४, दुपारी ४ दिनानाथ, पार्ले – ति. वि. ४ दिवस आधी सुरू




प्रसाद खांडेकर, भाग्यश्री मिलिंद, ओंकार राऊत, भक्ती देसाई, प्रथमेश शिवलकर, नम्रता संभेराव
प्रयोगासाठी संपर्क 9867877651, 9869438887

७८ वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही... न्यायाच्या प्रतीक्षेत उभे ज्येष्ठ ! जबाबदार कोण ?



सोम. १८ दु. ४ वा. ति.वि सुरु
डॉ. काशिनाथ घाणेकर मिनी नाट्यगृह, ठाणे

दोन अंकी लक्षवेधी नाटक – ऋग्वेद निर्मित
लोक काय म्हणतील ???

लेखन/दिग्दर्शन : डॉ. नीतीबाला कुलकर्णी * निर्माता : श्री अशोक समेळ * नेपथ्य : नितिन गवळी * प्रकाश योजना : संतोष नार्वेकर * रंगभूषा : विदुला नार्वेकर * संगीत : अविनाश गवाणकर
कला. डॉ. मीना विनय, शैलेश चव्हाण, प्रदीप कदम, सुरज पास्ते, मानसी उपासनी
सूत्रधार : सुरेश भोसले : संपर्क : ९३२३१४९३३३/७२०८२०५७८०

देश विदेश

# पवित्रा गौडा, दर्शन थुगुदीपाचा रेणुकास्वामी हत्येत जामीन रद्द

■ नवी दिल्ली

**रिक्षाचालक** रेणुकास्वामी हत्या प्रकरणी कन्नड अभिनेत्री पवित्रा गौडा आणि अभिनेता दर्शन थुगुदीपा यांच्यासह पाच आरोपींना कर्नाटक उच्च न्यायालयाने दिलेला जामीन आज सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. आरोपींना तुरुंगातही विशेष वागणूक दिली जाता कामा नये,असे आदेशही न्यायालयाने याप्रसंगी दिले.

कन्नड सिनेसृष्टीत खळबळ उडवून देणाऱ्या या हत्या प्रकरणात आरोपींची जामिनावर मुक्तता करण्याच्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाला कर्नाटक सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

या याचिकेवर न्या. जे. बी .पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. त्याप्रसंगी कर्नाटक उच्च न्यायालयाचा निकाल चुकीचा असल्याचे मत खंडपीठाने व्यक्त केले. कायद्यासमोर कोणीही मोठा किंवा लहान नाही, हे नैसर्गिक न्यायाचे तत्व या निर्णयामध्ये पाळले गेले नाही,असे स्पष्ट दिसते.न्यायालयाने आपल्या अधिकारांचा फक्त यांत्रिकपणे वापर केला आहे. आरोपींची जामिनावर मुक्तता केल्यामुळे खटल्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो,असे म्हणत खंडपीठाने सर्व आरोपींना उच्च न्यायालयाने दिलेला जामीन रद्द केला. रिक्षा चालक रेणुकास्वामी (३३) याने सोशल मीडियावर पवित्रा गौडा हिच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी केली होती.त्या रागातून अभिनेता दर्शन थुगुदीपा याने आपल्या चाहत्यांना चिथावणी देऊन रेणुकास्वामी याची हत्या करण्यास भाग पाडले,असा आरोप आहे. गेल्या वर्षी ९ जून रोजी रेणुकास्वामी मृतावस्थेत आढळून आला होता.पोलीस तपासात दर्शनचे नाव समोर आल्यानंतर त्याला ११ जून २०२४ रोजी अटक करण्यात आली. त्याच्या चौकशीतून पवित्रा गौडा आणि अन्य आरोपींची नावे पुढे आली.

# गृहनिर्माण भूखंड भ्रष्टाचारप्रकरण शेख हसीनाविरुद्ध सुनावणी सुरू

■ ढाका



**ढाकामधील** न्यायालयात माजी पंतप्रधान शेख हसीना आणि अन्य १७ जणांविरोधातील गृहनिर्माण भूखंड भ्रष्टाचाराच्या खटल्याची सुनावणी सुरू झाली आहे. त्यामध्ये हसीना यांची भाची आझमिना सिद्दीक आणि ब्रिटीश खासदार तुलिप सिद्दीक यांचाही समावेश आहे. याप्रकरणी अ‍ॅन्टी करप्शन कमिशनचे सहायक संचालक असलेले आफनान जन्नत हे तक्रारदार आहेत. त्यांनी विशेष न्यायालयाचे न्यायाधीश मोहम्मद रबिउल आलम यांच्यासमोर आपली साक्ष नोंदवली. यापूर्वी दुसऱ्या भ्रष्टाचार प्रकरणाचे तक्रारदार असलेले एसीसीचे उपसंचालक मोहम्मद सलाहुद्दीन यांनी देखील त्यांचे म्हणणे मांडले.

# युरोपात वणव्यांचा भडका घरे,कारखाने जळून खाक

■ रोम

**दक्षिण** युरोपमध्ये उष्णतेच्या लाटेमुळे आणि जोरदार वाऱ्यांमुळे लागलेल्या वणव्यांचा भडका कायम राहिला.या वणव्यांमुळे घरे,शेती आणि कारखाने जळून खाक झाली.परिणामी हजारो रहिवासी आणि पर्यटकांना स्थलांतरित करावे लागले आहे.संपूर्ण युरोपात उष्णतेची तीव्र लाट आली आहे. सर्वाधिक तापमानाची नोंद स्पेनमध्ये ४५ अंश इतकी नोंदवली गेली आहे.

ग्रीकमध्ये अथेन्सच्या पश्चिमेला, उत्तर पेलोपोनीजमधील पात्रास शहराच्या बाहेरील भागात, ऑलिव्ह ग्रोव्ह येथील जंगलांमधून पसरलेल्या वणव्यामुळे अनेक घरांना भीषण आग लागली. त्यामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. पात्रासजवळच्या दोन गावांतील रहिवाशांना घरे सोडण्याची सूचना देणारे नवीन अलर्ट जारी केले.

# नवीन विधी महाविद्यालयांना ३ वर्षे परवानगी मिळणार नाही

■ नवी दिल्ली

**कायद्याचे** शिक्षण देणाऱ्या खासगी महाविद्यालयांच्या संख्येत होत असलेली भरमसाट वाढ पाहून विधी शिक्षणाचा दर्जा कायम राखण्यासाठी बार काउन्सिल ऑफ इंडियाने देशभरातली नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यास तीन वर्षांची स्थगिती दिली आहे.

विधी शिक्षणाच्या क्षेत्रात खासगी शैक्षणिक संस्थांची संख्या प्रचंड वाढली असून त्यामानाने शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे.या खासगी संस्थांना विधी महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देताना राज्य सरकारे फारशी छाननी करत नाहीत. तसेच अनेक नामवंत शिक्षण संस्था अशा शिक्षण संस्थांना संलग्नता देताना आवश्यक ती काळजी घेत नाहीत.त्यामुळे विधी शिक्षणाच्या क्षेत्राचे वेगाने व्यावसायिकीकरण होत आहे. परिणामी शिक्षणाचा दर्जा राखण्याकडे संस्थांचे सोयिस्कररित्या दुर्लक्ष होते,असे आढळून आले आहे.

# उत्तर प्रदेश पोटनिवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशच्या सीतापूर जिल्ह्यातील महमुदाबाद नगरपालिका अध्यक्षपदाच्या पोटनिवडणुकीत भाजपाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला.समाजवादी पार्टीचे उमेदवार आमीर अराफत यांनी ८ हजार ९०६ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला.

भाजपाचे अनेक मंत्री आणि वरिष्ठ नेते या पोटनिवडणुकीच्या प्रचारात उतरले होते. त्यामुळे भाजपासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती. भाजपाने माजी खासदार राजेश वर्मा यांचे निकटवर्तीय संजय वर्मा यांना निवडणुकीत उतरवले. मात्र त्यांचा सपाटून पराभव झाला. त्यांना केवळ १ हजार ३५२ मते मिळाली. ते पाचव्या स्थानावर फेकले गेले.

# मला अटक करुन दारववाच! मादुरोंचे ट्रम्प यांना आव्हान

■ कराकस

**व्हेनेझुएलाचे** राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक करण्यासाठी अमेरिकेने ५० दशलक्ष डॉलरचे बक्षीस ठेवले आहे. त्यावरुन मादुरो प्रचंड आक्रमक झाले. व्हेनेझुएलामध्ये येऊन मला अटक करा, मी मिराफ्लोरेसमध्ये (राष्ट्राध्यक्ष भवन) तुमची वाट पाहात आहे.माझ्यासाठी भेकड लोकांनी उशीर करू नये,असे मादुरो यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना आव्हान दिले.

कोलंबियानेही निकोलस मादुरो यांना पाठिंबा दिला. कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी इशारा दिला की, व्हेनेझुएलावर अमेरिकेचा हल्ला हा त्यांच्या देशावर हल्ला मानला जाईल.परिस्थिती कितीही अशांत असली तरी आम्ही व्हेनेझुएलाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणार आहे. कोलंबिया आणि व्हेनेझुएला समान लोक,समान ध्वज आणि समान इतिहास सामायिक करतात.

दरम्यान, अमेरिकेने मादुरो यांची ७०० दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली.यामध्ये दोन खाजगी जेट विमानांचा समावेश आहे.ट्रम्प प्रशासनाचा आरोप आहे की, मादुरो हे ड्रग्ज तस्कर आणि ते कोकेन अमेरिकेत पाठवण्यासाठी ड्रग्ज कार्टेलसोबत काम करत आहेत. मादुरोंकडे ७ टन



कोकेन आहे, जे अमेरिकेत पाठवण्याची तयारी करत असल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे.



कृष्ण जन्माष्टमी निमित्त गोरेगावातील ईस्कॉन मंदिरात सजावटीसाठी जोरदार लगबग होती.

# मुंबई पालिका निवडणुकीचे नेतृत्व नवाब मलिक करणार

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांची मुंबईत राजकारणातील मुस्लीम चेहरा म्हणून ओळख आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्यावर आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आगामी मुंबई महापालिका निवडणुकीची जबाबदारी सोपविली आहे. नवाब मलिक यांची मुंबई निवडणूक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे,अशी माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली. मुंबई निवडणूक व्यवस्थापन समितीमध्ये नवाब मलिक यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, आमदार सना मलिक-शेख,माजी आमदार झिशान सिद्दीकी,प्रदेश सरचिटणीस संतोष धुवाळी,प्रदेश उपाध्यक्ष भास्कर विचारे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, राजू घुगे यांची नियुक्ती केली.नवाब मलिक हे यापुर्वी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असताना पक्षाचे मुंबई अध्यक्ष होते. राष्ट्रवादीचे मुस्लीम वोटर कार्ड म्हणुन नवाब मलिक यांच्याकडे पाहिले जाते. राष्ट्रवादी काँग्रेसची मुलूखमैदान तोफ अशीही त्यांची ओळख आहे.

# १४ वर्षांखालील गोविंदांचा मानवी मनोरे रचण्यात सहभाग नको

## मंडळांचे गोविंदा पथकांना आवाहन

■ मुंबई

**दहिसरमध्ये** दहीहंडी सरावावेळी सहाव्या थरावरून कोसळून ११ वर्षांच्या गोविंदाचा मृत्यु झाल्याची घटना घडली होती.त्यानंतर आता अनेक दहीहंडी उत्सव मंडळांनी १४ वर्षांखालील बाल गोविंदांना मानवी थर लावण्यात समाविष्ट करून घेऊ नका,असे जाहीर आवाहन गोविंदा पथकांना केले आहे. राज्यात दहीहंडीच्या उंचीवर मर्यादा नाही. परंतु १४ वर्षांखालील मुलांना मानवी थरांवर चढवू नये,त्यांना त्यात सहभागी करून घेऊ नका,असे सक्त आदेश सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच दिले आहेत. त्याचप्रमाणे गोविंदांचा विमा काढणे आणि सुरक्षा नियम पाळण्याचे निर्देश दिले आहेत. तरीही काही गोविंदा पथके आणि दहीहंडी उत्सव मंडळे व आयोजक या नियमांचे पालन करत नसल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे अशा दुर्घटना घडत आहेत,तरी गोविंदा पथकांनी १४ वर्षांखालील बाल गोविंदांना मानवी थर रचण्यात सहभागी करून घेऊ नका, असे आवाहन मुंबईतील अनेक मंडळांनी करत अन्य उपाययोजना सांगितल्या आहेत. मुंबईतील प्रसिद्ध गोविंदा पथक जय जवान मंडळाचे संदीप धनावडे आणि विजय निकम यांनी सांगितले की, १४ वर्षांखालील मुलांना सर्वात वरच्या थरावर चढवू नये, प्रत्येक गोविंदाने हेल्मेट, सरक्षक साधने वापरावी.

# गणेशोत्सवात मुंबई-गोवा मार्गावर ९०० पोलीस तैनात

■ रायगड

**कोकणात** जाणाऱ्या चाकरमान्यांचा गणेशोत्सव कालावधीत प्रवास निर्विघ्न पार पडावा यासाठी मुंबई-गोवा महामार्गावर तब्बल ९०० पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. गणेशोत्सवाच्या काळात या महामार्गावरील वाहतूक नेहमीपेक्षा १० ते १२ पट वाढते. ज्यामुळे वाहतूक कोंडी आणि इतर अडचणींचा सामना प्रवाशांना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर काल उबाठा गटाने माजी आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली सिंधुदुर्गातील हुमरमळा येथे आंदोलन केले. त्यानंतर जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारने प्रवास सुरळीत करण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावर दरवर्षीप्रमाणेच गणेशोत्सवात अवजड वाहनांना बंदी असणार आहे. तसेच पोलीस विभागामार्फत ७ उपविभागीय पोलीस अधिकारी, २२ पोलीस निरीक्षक, ७२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ७६२ पोलीस कर्मचारी व होमगार्ड, राज्य राखीव दल आणि शीघ्र कृती दल तैनात केले जाणार आहे.

पोलिसांना गस्तीसाठी जीप व मोटारसायकली असणार आहेत. तसेच संपर्कासाठी ७४ बिनतारी संच देण्यात येणार आहेत. अपघात किंवा वाहन बिघाड झाल्यास महामार्ग मोकळा ठेवण्यासाठी २० टोकण क्रेन व्यवस्था केली जाणार आहे. याचसोबत २० रुग्णवाहिकांच्या फेऱ्याही महामार्गावर चालू राहणार आहेत. रुग्णवाहिकांमध्ये डॉक्टर, परिचारिका असणार आहेत.

# हिंदुस्थान बँकेची निवडणूक सलग तिसऱ्यांदा बिनविरोध

## अध्यक्षपदी पुन्हा गुलाबराव जगताप

■ मुंबई

**सहकार** क्षेत्रातील नावाजलेल्या आणि माथाडी कामगारांच्या कष्टाच्या पैशातून प्रगतीपथावर पोहचलेल्या दि हिंदुस्थान को-ऑप. बँक लि. बँकेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली.

या बँकेच्या सभासदांनी पुन्हा एकदा बँकेचे अध्यक्ष,माथाडी कामगार नेते गुलाबराव जगताप यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाला सलग तिसऱ्यांदा बिनविरोध निवडून दिले. अध्यासी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई शहर (१) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या पहिल्या सभेत गुलाबराव जगताप यांची बँकेच्या अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी चंद्रकांत बोडके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी बँकेचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ संचालक प्रकाश नार्वेकर यांच्यासह तुकाराम मोटे, संगीता दुधाळ या माजी संचालकांना पुन्हा एकदा संचालकपदी काम करण्याची संधी देण्यात आली.तर मोहित जगताप,बापू गडद,शरद गोडसे, श्रीमत मोहिते, गणेश झांजे, विलास मागाडे, धनंजय जमदाडे आणि विमल मराठे यांना प्रथमच संचालक पदावर संधी देण्यात आली आहे.

# आयसीआयसीआय बँकेने शिल्लक रक्कम कमी केली

■ मुंबई

**आयसीआयसीआय** बँकेने बचत खात्यांवरील किमान शिल्लक रक्कम कमी केली आहे. १ ऑगस्ट २०२५ नंतरच्या खातेदारांना हे लागू होणार आहे. बँकेने शहरी व महानगर भागांतील किमान शिल्लक रक्कम ५० हजार रुपये केली होती. त्यावरून टीका झाल्यावर ती रक्कम कमी करून १५ हजार रुपये केली आहे. निम्नशहरी भागासाठी ७ हजार ५०० रुपये आणि ग्रामीण भागासाठी २ हजार ५०० केली आहे.

मात्र दंडाच्या रक्कमेत वाढ केल्याने काही प्रमाणात आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे. जर ग्राहकांनी दरमहा किमान शिल्लक रक्कम राखली नाही तर त्यांना कमतरतेच्या ६ टक्के रक्कम किंवा ५०० रुपये दंड आकारला जाणार आहे. यापूर्वी हा दंड ४५० रुपये होता.

# प्रशांत यादव भाजपात जाणार कोकणात शरद पवारांना धक्का

■ रत्नागिरी

**कोकणातील** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला धक्का बसणार आहे. या पक्षाचे कोकणातील नेते प्रशांत यादव १९ ऑगस्ट रोजी भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी दिली.

नितेश राणे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, कोकणात भाजपा आमदाराला ताकद देणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही जेव्हा भाजपात प्रवेश केला तेव्हा पक्षाने आम्हाला ताकद दिली. भाजपा हा कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभा राहणारा एकमेव पक्ष आहे. इतर पक्ष फक्त बोलतात, आम्ही काँग्रेसचा अनुभव घेतलेला आहे. भाजपा खऱ्या अर्थाने काम करणाऱ्यांना संधी देतो. यादव यांच्या पक्षप्रवेशामुळे पक्षाला कोकणात आणखी बळ मिळेल. प्रशांत यादव हे शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कोकणातील नेते आहे.

# मत्स्यगंधा एक्स्प्रेसमधून महिलेचा पडून मृत्यू

■ कोलाड

**मुंबईहून** मंगळूरकडे जाणाऱ्या मत्स्यगंधा एक्स्प्रेसमधून पडून सविता हिरालाल मखवाना (३०) या महिलेचा मृत्यू झाला. ही घटना गोवे गावाच्या हद्दीत काल सायंकाळी घडली. सविता मखवाना या गुजरातच्या अहमदाबाद येथील रहिवासी होत्या. प्रवासादरम्यान त्यांचा तोल जाऊन त्या गाडीतून खाली पडल्या. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# इचलकरंजीत २४ तासांत मांसाहार बंदीचा निर्णय मागे

■ कोल्हापूर

**स्वातंत्र्यदिनाच्या** पार्श्वभूमीवर राज्यातील अनेक महापालिकांनी मांस विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले. या विरोधाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील इचलकरंजी महापालिकेने २४ तासांतच मांस विक्री बंदीचा आदेश मागे घेतला आहे. त्यामुळे शहरात चिकन-मटण विक्री सुरूच राहणार आहे.

कल्याण-डोंबिवलीनंतर मालेगाव, अमरावती, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इचलकरंजी या महापालिकांच्या आयुक्तांनी मांस विक्री बंदीचे आदेश जारी केले होते. याला विरोधी पक्ष, खाटीक समाज आणि मांस विक्रेते यांनी जोरदार विरोध केला. इचलकरंजी महापालिकेने बंदीचा आदेश जारी करताच मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली. १५ ऑगस्ट रोजी मांस विक्री सुरू ठेवावी, अशी मागणी काही लोकांनी पालिकेत केली होती. अखेर, जनभावना आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन महापालिकेने २४ तासांतच आदेश मागे घेतल्याचे स्पष्ट केले.

# दहिसर टोलनाका २ किलोमीटर पुढे स्थलांतरित करण्याचे आदेश

■ भाईंदर



**पश्चिम** द्रुतगती महामार्गावरील दहिसर टोलनाक्याजवळ प्रचंड वाहतूककोंडी होत असते. परंतु आता ही वाहतूककोंडी फोडण्यासाठी दहिसर टोलनाका दोन किलोमीटर पुढे वेस्टर्न हॉटेलजवळ स्थलांतरित करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तशी मागणी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली होती.

दहिसर टोल नाक्यामुळे मिरा-भाईंदर शहरातील १५ लाख स्थानिक नागरिक, वाहनचालक, तसेच मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.यामुळे प्रवासाचा वेळ वाढत असून इंधनाचा विनाकारण अपव्यय होत आहे.

# आयारामांमुळे संघ प्रदूषित होईल स्वामी गोविंददेव गिरींचा इशारा

■ पुणे

**आयारामांमुळे** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रदूषित होण्याची शक्यता असल्याचा इशारा अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांनी संघ नेतृत्वाला दिला आहे. पुण्यातील मृत्युंजय भारत या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला ते उपस्थित होते.

गोविंददेव गिरी म्हणाले की, राज्यात महायुती सरकार स्थापन झाल्यापासून अनेक दिग्गज नेते भाजपात प्रवेश करत आहेत. यातील काही नेते भाजपा आणि संघाचे कट्टर विरोधक होते. मात्र राजकीय फायद्यासाठी ते आता भाजपात येत आहेत. तप आणि त्यागाला न्याय द्यायचा असेल तर यापुढे देश टिकवणे आपली जबाबदारी आहे. संघाच्या व्यापक कार्यात विविध ठिकाणाहून जी मंडळी आयात होत आहेत त्यांचे संस्कार वेगळे आहेत. त्यांना कधीच संघ आणि हिंदुत्व मान्य नव्हते, ज्यांना नैतिकता कशाशी खातात हे समजत नाही, अशा लोकांची आयात जास्त प्रमाणात झाली आहे.

# नागावच्या जत्रेतील शर्यतीत दानोळीच्या बैलजोडीची बाजी

■ कोल्हापूर

**हातकणंगले** तालुक्यातील नागाव येथील श्री खणाईदेवी यात्रेनिमित्त भव्य शर्यतीचे आयोजन केले होते. या बैलगाडी शर्यतीमध्ये अ गटात दानोळीच्या सचिन मदने यांच्या बैलजोडीने प्रथम क्रमांक पटकावला. तर भिलवडीच्या पाटील डेअरीच्या बैलजोडीने द्वितीय क्रमांक पटकावला. तृतीय क्रमांक शिरोलीच्या सुदर्शन कदम यांच्या नेतृत्वाखाली यांच्या बैलजोडीने पटकावला.

या शर्यतीतील ब गटात प्रथम क्रमांक पाटील डेअरी (भिलवडी), द्वितीय क्रमांक अरविंद फोटो (इचलकरंजी), तृतीय क्रमांक सम्राट बेळके (नागाव), यांच्या बैलजोडीने पटकावला. बिनदाती गाडी शर्यतीमध्ये प्रथम क्रमांक सुशांत ढेरे (हेरले), द्वितीय क्रमांक निलेश खोत (नेज), तृतीय क्रमांक शितल खरात (आळते) यांच्या बैलजोडीने पटकावला. बिनदाती नवतर आदत शर्यतीमध्ये प्रथम क्रमांक नागावच्या विशाल सावंत, द्वितीय क्रमांक शुभम गुडाळे आणि तृतीय क्रमांक सौरभ गुडाळे यांच्या बैल गाडीने मिळविला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम आणि सन्मान चिन्ह देण्यात आले. ही शर्यत पाहण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# २६ कोटींचे फसवणूक प्रकरण आमदार रवींद्र फाटक निर्दोष

■ मुंबई

**शिंदे** गटाचे आमदार रवींद्र फाटक आणि त्यांच्या पत्नीला गिरगाव कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. २०१५ सालच्या २६ कोटी रुपयांच्या फसवणूक प्रकरणात कोर्टाने त्यांची निर्दोष सुटका केली. या प्रकरणात फाटक दाम्पत्यासह एकूण आठ जणांची निर्दोष सुटका झाली आहे. ठाण्यातील एका भूखंडाच्या मालकी हक्कावरून फाटक यांच्या विरोधात त्यांच्या व्यावसायिक भागीदाराने एमआरए मार्ग पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले की, हा वाद दिवाणी स्वरूपाचा असून बचाव पक्षाने मांडलेल्या विवादित रक्कम आधीच देण्यात आली होती. या युक्तिवादाला मान्यता दिली. परिणामी, सर्व आरोपींना निर्दोष घोषित करण्यात आले. या निर्णयामुळे रवींद्र फाटक यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# ...... हे स्वातंत्र्य सामर्थ्याचे

आज भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन आहे. म्हणजे जवळपास आठ दशकांचा स्वातंत्र्याचा हा प्रवास भारतीयांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. सातत्याने जपलेले स्वातंत्र्याचे स्वप्न प्रत्यक्षात येत असताना भारतीयांचा स्वाभिमान या दिवशी मोठ्या गौरवाने व्यक्त होत असतो. संपूर्ण देशभर आज होणारे स्वातंत्र्य दिनाचे कार्यक्रम म्हणजे आपल्या भारत मातेविषयीची व्यक्त होणारी ती अतिशय मौलिक अशी भावना असते. त्यामधून स्वातंत्र्याविषयीचा आदर तर व्यक्त होतोच. परंतु या आपल्या भारतमातेविषयीची कृतज्ञता त्यातून साकार होते. विशेष म्हणजे हे स्वातंत्र्य ज्या क्रांतिकारकांमुळे स्वातंत्र्यसैनिकांमुळे आणि हुतात्म्यांमुळे मिळाले त्या सर्वांविषयी आदर व्यक्त करण्यासाठी साजरा होतो. शिवाय भविष्यकाळामध्ये हे मिळालेले स्वातंत्र्य अधिक समृद्ध व्हावे यासाठी सुद्धा निर्धार व्यक्त करण्याची ही एक तितकीच मोठी संधी असते. म्हणूनच दरवर्षी लाल किल्ल्यावर होणारा स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आणि त्यातून राष्ट्राचे प्रमुख म्हणून पंतप्रधानांकडून केले जाणारे भाषण भारताने आतापर्यंत केलेल्या प्रगतीचा आढावा घेणारे आणि भविष्यकाळामध्ये भारताला काय काय करायचे आहे त्याचे सुद्धा वर्णन या भाषणांमधून होत असते. थोडक्यात भारताचा एक धोरणात्मक आढावा या निमित्ताने घेतला जातो आणि तोच भारताच्या पुढच्या प्रगतीचा एक आलेखही असतो. या दृष्टिकोनातून विचार केला तर गेल्या आठ दशकांमध्ये भारताने केलेली प्रगती किंवा विकास हा निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. जगाच्या पाठीवर अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाली. परंतु आज जेवढी काही विकसनशील राष्ट्रे आहेत त्या राष्ट्रांमध्ये भारताने स्वतंत्र झाल्यानंतर अल्पावधीत केलेला विकास हा निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. इतक्या कमी कालावधीमध्ये इतका मोठा विकास घडवून आणण्याचे काम कोणत्याही विकसनशील राष्ट्राला करता आलेले नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. म्हणूनच भारताच्या या स्वातंत्र्याचे एक वेगळे वैशिष्ट्य निश्चितपणे नोंदवता येते. अर्थातच भारताची एकूण भौगोलिक परिस्थिती आणि इथली सर्वाधिक लोकसंख्या याचा विचार करत असताना अनेक जाती, पंथ, धर्म संप्रदाय या सर्वांची ही विविधता टिकवून ठेवणे हेदेखील तितकेच मोठे आव्हान ठरते.

### संकटांचा सामना

गेल्या आठ दशकांमध्ये भारतावर आलेल्या अनेक संकटांचा देखील भारताने तितक्याच सक्षमपणे मुकाबला केल्याचे पाहायला मिळते. जवळपास चार मोठी युद्ध भारताला लढावी लागली. त्यात एक चीन बरोबरचे युद्ध सोडले तर बाकीची तीन युद्ध ही शेजारच्या पाकिस्तानबरोबर लढावी लागली आणि त्यात भारताने विजयी होऊन दाखवले आणि त्यातच भारताच्या या स्वातंत्र्याचे सामर्थ्य दडलेले असते. या मधल्या काळातसुद्धा दहशतवादी घटना जाती धर्मातील दंगली यातून भारताला स्थिर करण्याचे अनेक प्रयत्न झालेले आहेत. त्या सगळ्यांवर मात करीत भारताने केलेला हा प्रवास निश्चितच महत्त्वाचा ठरतो. १९४७ ला मिळालेले स्वातंत्र्य आणि आता २०४७ पर्यंत संपूर्ण विकसित राष्ट्र म्हणून उभे राहण्याचा भारताचा हा संकल्प हा मोठा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. भारताची ही प्रगती होत असतानाच काही मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येत नाही. भारताने संसदीय लोकशाहीचा प्रयोग स्वीकारला ज्यामध्ये सर्वसामान्य माणसाच्या अधिकारांचे संवर्धन करण्याचे आश्वासन दिले गेले. दुर्दैवाने आपल्या राजकारण्यांनी मिळालेल्या या स्वातंत्र्याचा आणि संसदीय लोकशाहीचा केवळ सत्तेसाठी उपयोग केला आणि सत्ता राबवत असताना निवडणुका जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवले. मग अगदी सुरुवातीची तीन दशकं गरिबी हटावचा नारा देत निवडणुका जिंकल्या गेल्या. परंतु गरिबी कमी होऊ शकली नव्हती. उलट गरीब आणि श्रीमंतीमध्ये दरी वाढत गेली. म्हणूनच आपल्या देशामध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळजवळ ७० दशकं गरिबी आणि बेरोजगारीचे संकट मोठ्या प्रमाणावर उभे राहिले जे आता गेल्या दोन-तीन दशकांमध्ये थोडे कमी होताना दिसत आहे. ९० च्या दशकामध्ये आपण स्वीकारलेले मुक्त आर्थिक धोरण आणि त्यातून विकसित झालेली औद्योगिकीकरणाची नीती आता थोडीफार आपल्याला प्रत्यक्षात काही लाभ देताना दिसते आहे. परंतु जगाच्या बरोबरीने जाण्याचा निर्धार व्यक्त होत राहिल्याने आज भारताने अनेक क्षेत्रांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. मग ते तंत्रज्ञान असेल, अंतराळ संशोधन असेल किंवा औद्योगिकीकरणांमध्ये सुद्धा भारताने मोठी मजल मारलेली आहे.

### वेगाने विकास

आज तिसरी आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने भारताचा होत असलेला प्रयत्न हा निश्चितच आशादायक ठरतो. मात्र त्यातून सामान्य माणसाच्या मूलभूत गरजा तितक्याच वेगाने पूर्ण व्हायला हव्यात. स्वातंत्र्य हे प्रत्येक व्यक्तीच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारे ठरले पाहिजे. हा १९७० च्या दशकामध्ये प्रख्यात कवी ग. दि. माडगूळकर यांनी हे 'राष्ट्र देवतांचे' असे म्हणत 'आ चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे' अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली होती. हे स्वातंत्र्य टिकले पाहिजे ही दुर्दम्य इच्छा त्यातून व्यक्त झाली. कारण या राष्ट्राला दिव्य अशी संस्कृती लाभलेली आहे आणि त्यातून हा भारत पुन्हा एकदा स्वाभिमानाने आणि पूर्ण सामर्थ्यशाली झालेला पाहायला मिळेल अशीच सगळ्यांची अपेक्षा आहे. म्हणूनच भारताच्या स्वातंत्र्याचे फलित विचारात घेताना मिळालेले स्वातंत्र्य हे सामान्य माणसाला आणि देशाला सामर्थ्यशाली करणारे झाले पाहिजे. हे स्वातंत्र्य सामर्थ्याचे असेच त्याचे स्वरूप कायम राहिले पाहिजे. त्याच्या या सामर्थ्यामध्ये संकटं निर्माण करण्याचा यापुढेही प्रयत्न होत राहील. कारण ज्या वेगाने भारत आत्मनिर्भर होत आहे. जगातल्या विकसित देशांनादेखील आश्चर्यचकित करणारे ठरते आहे. अर्थातच सगळ्या संकटांमध्ये या देशातील जनता एकजूट दाखवून त्या सामर्थ्याचाच परिचय देत असते. हेदखील स्वतंत्र भारताचे अत्यंत महत्त्वाचे लक्षण ठरते.


## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

स्वतःच्या चुकीला 'वकील' आणि इतरांच्या चुकीला 'न्यायाधीश' होणाऱ्या माणसांशी हुज्जत घालण्यापेक्षा तुझंच खरं म्हणून संपवलेला विषय हा आपल्यासाठी चांगलाच असतो.

## पंचांग

शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर



श्रावण कृष्ण सप्तमी
नक्षत्र : अश्विनी/भरणी

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मेष

रवी उदय- ०६-२१
रवी अस्त- १९-०५

स्वातंत्र्य दिन, श्रीकृष्ण जयंती (उपवास); पारसी नववर्षारंभ १३९५ प्रारंभ, जरा-जिवंतिका पूजन

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



## दहीकाला



★ **साहित्य-** १/२ कप ताजे दही, १/२ दीड वाटी पोहे, १/४ कप किसलेले खोबरे, बारीक चिरलेली छोटी काकडी, बारीक चिरलेली छोटी हिरवी मिरची, २ चमचे भाजलेले शेंगदाणे, बारीक चिरलेली कोथिंबीर, १ चमचा जिरे, १ चमचा मोहरी, १/२ चमचा साखर, चवीनुसार मीठ, १ टेबलस्पून तूप, कढीपत्ता.

★ **कृती -** सगळ्यात आधी पोहे स्वच्छ धुवून घ्या. जाड पोहे वाहत्या पाण्याखाली चाळणीत धुवून सर्व पाणी काढून टाका व बाजूला पाणी नितळण्यासाठी ठेवावे. मग त्यात कोथिंबीर, काकडी, मीठ, डाळींबाचे दाणे हे सर्व पदार्थ एकत्र करा. नंतर या मिश्रणात दही घाला. आता एका छोट्या कढईत तूप गरम करून त्यात जिरे, मोहरी आणि कढीपत्ता टाका आणि काही सेकंद तडतडू द्या. आता ही फोडणी पोह्यांच्या मिश्रणात घाला, चवीनुसार साखर आणि मीठ घाला आणि सर्व साहित्य चांगले मिसळा. आता तुमचा नैवेद्याचा दहीकाला बनून तयार आहे.

# जागतिक अजिंक्यपद स्पर्धा २५ ऑगस्टपासून सुरू
# भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर चीनचे मोठे आव्हान

**भारतीय बॅडमिंटनपटूंचा २५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील मार्ग अडथळ्याचा राहणार आहे. या स्पर्धेसाठी कार्यक्रम पत्रिका काढण्यात आली, तेव्हा भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर सुरुवातीपासून कठीण आव्हान राहणार आहे. पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनची पहिल्याच फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या चीनच्या शी यू क्यू याच्याशी गाठ पडणार आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत उपांत्य फेरीत पराभूत झाल्यानंतर लक्ष्यला पूर्ण हंगामात संघर्षाचाच सामना करावा लागला आहे. लक्ष्य सध्या जागतिक क्रमवारीत २१व्या स्थानावर आहे.**



■ पॅरिस

एकेरीतील दुसरा खेळाडू एच. एस. प्रणॉयला पहिल्या फेरीत फिनलँडच्या जोकिम ओलडॉर्फ या दुबळ्या प्रतिस्पर्ध्याशी खेळायचे आहे. अर्थात, हा अडथळा पार केल्यावर दुसऱ्या फेरीत त्याच्यासमोर जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनचे आव्हान असू शकते. महिला एकेरीत पी. व्ही. सिंधूलादेखील पहिल्या फेरीत आव्हान नसेल. तिची गाठ बल्गेरियाच्या कालोयाना नालबांटोवा विरुद्ध होईल. पण, दुसऱ्या फेरीत तिला जागतिक क्रमवारीतील दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनच्या वांग झी यी हिचे आव्हान अपेक्षित आहे. पुरुष दुहेरीत सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीला पहिल्या फेरीत पुढे चाल आहे. दुसऱ्या फेरीत त्यांचा सामना मलेशियाच्या हरिहरन अम्साकारुनन-रुबेन कुमार किंवा तैवानच्या लिऊ कुआंग हेंग-यांग पो हान यांच्यातील विजेत्याशी होईल. भारतीय जोडीची आगेकूच कायम राहिल्यास उपांत्यपूर्व फेरीत त्यांच्यासमोर मलेशियाच्या आरोन चिया-सोह वुई यिक यांचे आव्हान असू शकते. अर्थात, आतापर्यंत भारतीय जोडीने या जोडी विरुद्ध झालेल्या १४ पैकी ११ लढतींत विजय मिळविला आहे.

## ऑस्ट्रेलियाचा मिचेल ओवेन टी-२०, वनडे मालिकेतून बाहेर

■ डर्बन

ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकन संघात सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना शनिवारी खेळला जाणार आहे. या सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या संघाचा स्टार अष्टपैलू मिचेल ओवेन दुखापतीमुळे उर्वरित टी-२० आणि एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला. आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यादरम्यान ओवेनच्या हेल्मेटला वेगवान चेंडू लागला होता. बॉल लागल्यावर मिचेल ओवेनची चाचणी झाली, जी त्याने त्यावेळी उत्तीर्ण केली. परंतु नंतर त्याला अस्वस्थता जाणवली. ज्यामुळे त्याला संपूर्ण मालिकेतून बाहेर पडावे लागले. क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ओवेनला १२ दिवस विश्रांती घ्यावी लागेल. यामुळे तो दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शेवटच्या टी-२० आणि ३ एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही.

## लिएंडर पेसचे वडील वेस पेस यांचे निधन

■ कोलकाता



**माजी** टेनिसपटू लिएंडर पेसचे वडील वेस पेस यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. ते पार्किन्सन आजाराने ग्रस्त होते. मंगळवारी सकाळी त्यांना कोलकाता येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची उपचारादरम्यान प्राणज्योत मावळली. वेस १९७२ मध्ये ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचे सदस्य होते. वेस हे भारतीय हॉकी संघात मिडफिल्डर म्हणून खेळले. त्यांनी फुटबॉल, क्रिकेट आणि रग्बी सारख्या अनेक खेळांमध्येही हात आजमावला. ते स्पोर्ट्स मेडिसीनचे डॉक्टर देखील होते. त्यांनी अनेक वर्षे बीसीसीआयच्या अँटी-डोपिंग विभागात काम केले. डॉ. वेस यांनी कोलकाता क्रिकेट आणि फुटबॉल क्लबचे अध्यक्ष म्हणूनही काम केले.

## एमसीसीच्या इंग्लंड दौऱ्यात साहिल, अयाझ, जमूला चमकले

■ लंडन

क्रिकेट प्रशिक्षक ज्वाला सिंग यांच्या एमसीसीच्या (मुंबई क्रिकेट क्लब) वतीने त्यांच्या अकादमीतील युवकांना इंग्लिश वातावरणात खेळण्याचा अनुभव मिळावा यासाठी ५० दिवसांच्या इंग्लंड दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यात त्यांचा १६ वर्षांखालील मुलांचा संघ आणि १९ ते ३० वयोगटातील मुलांचा संघ असे दोन संघ या दौऱ्यात सहभागी झाले होते. या दौऱ्यात ते २२ सामने खेळले आणि १८ सामने जिंकले आणि त्यापैकी केवळ चार सामन्यांत त्यांना हार पत्करावी लागली. या सामन्यांमध्ये देव जमूला याने दोन शतकी खेळींसह ६०० धावा केल्या तर मुंबईचे साहिल जाधव आणि अयाझ खान या युवकांनी प्रत्येकी ४०० धावा करून आपण मोठ्या सामन्यात खेळण्यासाठी तयार असल्याचे दाखवून दिले आहे. या दौऱ्यात ते विविध क्लब, एटन कॉलेज, हॅरो स्कूल, हॅम्पटन स्कूल, चेस क्रिकेट क्लब, स्टोर स्कूल अशा विविध संघांविरुद्ध सामने खेळले. या खेळाडूंना या दौऱ्यादरम्यान भारताचे माजी सलामीवीर वासिम जाफर तसेच मुंबई क्रिकेट क्लबचे संस्थापक संचालक विनायक सामंत आणि भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि पृथ्वी शॉ यांचे प्रशिक्षक ज्वाला सिंग यांचे मार्गदर्शन लाभले.

## चेन्नईने नाकारली राजस्थानची ऑफर

■ चेन्नई

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार आणि यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसनने आयपीएल २०२६ च्या हंगामापूर्वी संघातून बाहेर पडण्याची इच्छा व्यक्त केली. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्समध्ये जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते, पण आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. चेन्नई सुपर किंग्सने राजस्थान रॉयल्सने दिलेला ट्रेड प्रस्ताव नाकारला. राजस्थान रॉयल्सने सॅमसनच्या बदल्यात चेन्नईकडून अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा, फलंदाज ऋतुराज गायकवाड किंवा शिवम दुबे यापैकी एकाची मागणी केली होती. मात्र, चेन्नई व्यवस्थापनाने ही मागणी स्पष्टपणे फेटाळली. सीएसकेने आपल्या कोणत्याही प्रमुख खेळाडूला सोडण्यास तयार नाही. त्यामुळे सॅमसनचा चेन्नईमध्ये जाण्याचा मार्ग सध्या बंद झाला आहे.


## यूएस टेनिस ओपन विल्यम्सला वाईल्ड कार्ड

■ न्यूयॉर्क

अमेरिकन टेनिसपटू व्हीनस विल्यम्स दोन वर्षांनंतर यूएस ओपनसह ग्रँड स्लॅम टेनिसमध्ये पुनरागमन करणार आहे. तिला वयाच्या ४५ व्या वर्षी वर्षातील शेवटच्या ग्रँड स्लॅममध्ये एकेरी सामन्यांत भाग घेण्यासाठी वाईल्ड कार्ड मिळाले. व्हीनस १९८१ मध्ये वयाच्या ४७ व्या वर्षी रेनी रिचर्ड्सनंतर या स्पर्धेच्या एकेरी सामन्यांमध्ये भाग घेणारी सर्वात वयस्कर खेळाडू असेल.

## भारतीय धावपटू गुलवीर सिंगने स्वत:चाच विक्रम मागे टाकला

■ नवी दिल्ली



**बुडापेस्टमधील** जिउलाय इस्तवान मेमोरियल हंगेरियन अॅथलेटिक्स ग्रां प्रि स्पर्धेत पुरुषांच्या ३००० मी. धावण्याच्या शर्यतीत भारताच्या गुलवीर सिंगने स्वत:चाच राष्ट्रीय विक्रम मागे टाकला. मात्र त्याला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले. गुलवीरने ही शर्यत ७ मिनिटे ३४.४९ सेकंदात पूर्ण केले. याआधी त्याने ७:३८.२६ मि.चा राष्ट्रीय विक्रम नोंदवला होता. यावर्षी फेब्रुवारीत बोस्टन युनिव्हर्सिटी येथे झालेल्या निमंत्रितांच्या स्पर्धेत त्याने हा विक्रम नोंदवला होता. २७ वर्षीय गुलवीर युरोपमध्ये प्रथमच ट्रॅक रेसमध्ये सहभागी झाला होता. बुडापेस्टमधील ही स्पर्धा वर्ल्ड अॅथलेटिक्स कॉन्टिनेन्टल टूर गोल्ड स्पर्धा आहे. केनियाच्या किपसंग मॅथ्यू किपचुम्बाने ७:३३.२२ मि. वेळ नोंदवत सुवर्ण, मेक्सिकोच्या एदुआर्दो हेरेराने ७:३३.५८ मि. रौप्य व युगांडाच्या ऑस्कर चेलिमाने ७:३३.९३ मि. अवधी नोंदवत कांस्यपदक मिळविले. गुलवीरने १३ सप्टेंबरपासून टोकियोत सुरू होणाऱ्या वर्ल्ड अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी याआधीच पात्रता मिळविली आहे.

## बीओबी चषक जिंकण्यासाठी ९२ बुद्धिबळपटूंमध्ये आज चुरस

■ मुंबई

**आयडियल** स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा-बीओबी पुरस्कृत स्वातंत्र्य दिनी होणाऱ्या १४ वर्षांखालील जलद बुद्धिबळ स्पर्धा जिंकण्यासाठी फिडे गुणांकित सबज्युनियर बुद्धिबळपटूंसह मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यातील ९२ खेळाडूंमध्ये चुरस राहील. राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा परेल येथील आरएमएमएस वातानुकूलीन सभागृहात स्विस लीग पध्दतीच्या किमान ४ फेऱ्यांमध्ये होईल. प्रत्येक साखळी फेरी १५ मिनिटे अधिक ३ सेकंद इन्क्रिमेंटची राहील. मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना मान्यतेने ७, ८, १०, ११, १३, १४ वर्षांखालील ६ वयोगटातील प्रत्येक वयोगटामध्ये गुणानुक्रमे पहिल्या १५ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक पुरस्कार दिला जाईल.

## भारताच्या डी गुकेशने चौथे स्थान मिळवले

■ सेंट लुईस

जागतिक विजेता डी गुकेशने अमेरिकेच्या लीनर डोमिंग्वेझ पेरेझकडून झालेल्या पराभवानंतर पुनरागमन केले आणि येथे ग्रँड चेस टूरच्या सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झच्या रॅपिड विभागात वेस्ली सो आणि फॅबियानो कारुआना या अमेरिकन जोडीचा पराभव केला आणि चौथे स्थान मिळवले.

गुकेशने पराभवाने सुरुवात केली तेव्हा हा सलग तिसरा दिवस होता, पण तरीही तो चौथे स्थान मिळवण्यात यशस्वी झाला. या स्पर्धेची बक्षीस रक्कम १,७५,००० अमेरिकन डॉलर आहे आणि त्यात अजून १८ ब्लिट्झ गेम खेळायचे आहेत. गुकेशविरुद्ध पराभव पत्करावा लागला तरी, कारुआना १४ गुणांसह रॅपिड श्रेणीत अव्वल स्थानावर राहिला. त्याच्या पाठोपाठ आर्मेनियन-अमेरिकन लेव्हॉन अॅरोनियन १३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. फ्रान्सचा मॅक्सिम वाचियर-लाग्राव्ह ११ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, जो गुकेशपेक्षा एक गुण पुढे आहे.



# प्रवीण ठिपसे

## ग्रँडमास्टर हा किताब मिळवणारे पहिले भारतीय बुद्धिबळपटू

**प्रवीण ठिपसे यांचे वडील डॉ. महादेव ठिपसे हे महात्मा गांधींचे अंगरक्षक होते. स्वातंत्र्यलढ्यासाठी १० वर्षे दिल्यानंतर ते डॉक्टर झाले आणि त्यांनी मुंबईत प्रॅक्टिस सुरू केली. प्रवीण ठिपसे यांच्या आईनी आपल्या सर्व मुलांना बुद्धिबळाचं वेड लावलं. तेही इतकं की, येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला ही मुलं खेळायचा आग्रह करत. मोठे बंधू अभय यांना खेळाचं तांत्रिक ज्ञान अवगत होतं आणि शिकवण्याचं कौशल्यही. बुद्धिबळाचे क्लिष्ट धडे ते अत्यंत सोप्या शब्दात धाकट्या दोघा भावांना देत. त्यांची ही हातोटी बघून पुढे अनेक वर्षांनी महाराष्ट्र शासनाने त्यांना बुद्धिबळ प्रशिक्षणासाठीचा मानाचा 'दादोजी कोंडदेव पुरस्कार' देऊन गौरवले होते.**

आईकडून प्राथमिक धडे घेतल्यावर प्रवीण ठिपसे यांनी सहा-सातव्या वर्षीच वेगवेगळ्या शालेय स्पर्धा खेळायला सुरुवात केली. आईची एक आठवण सांगताना म्हणतात. ''१९७० मध्ये मी आठवी-नववीत असताना आमच्या शाळेने आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होण्याविषयी अनास्था दाखवल्याने आईने शाळा बदलण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ती दादरच्या बालमोहन शाळेत जाऊन दादासाहेब रेगे यांना जाऊन भेटली. परिणामी १९७२-७३ आणि १९७३-७४ या दोन्ही वर्षी बुद्धिबळाचा आंतरशालेय करंडक 'बालमोहन'कडे आला आणि त्यानंतरही पुढची तीन वर्षे प्रवीण ठिपसे यांचा धाकटा भाऊ सतीश यांनी तो शाळेकडेच राखला. आंतरशालेय करंडक जिंकल्यामुळे रामचंद्र सप्रे, श्रीकृष्ण साखळकर, अरुण वैद्य, सुरेश शाळिग्राम, अविनाश आपटे.. अशा महाराष्ट्रातील नामवंत खेळाडूंचं लक्ष प्रवीण ठिपसे यांनी वेधून घेतलं. त्यानंतर या दिग्गजांचा खेळ बघत, त्यांच्या चर्चा ऐकत या एकलव्याची साधना सुरू झाली आणि त्याने एक-दोन वर्षांतच प्रथम राज्य व नंतर राष्ट्रीय पातळीवर खेळायला सुरुवात केली. संपूर्ण भारताचं लक्ष वेधून घेणारी १९७४ मधली एक घटना प्रवीण ठिपसे यांच्या जीवनात घडली. बुद्धिबळावर ज्यांनी १०० च्यावर पुस्तकं लिहिली आहेत, असे रशियाचे प्रसिद्ध खेळाडू युरी अवेरबाख भारतात आले असताना, ते एकाच वेळी २५ अव्वल खेळाडूंशी खेळतील असं जाहीर करण्यात आलं. त्यांपैकी २४ खेळाडूंना त्यांनी हरवलं. त्यांची एकच मॅच बरोबरीत सुटली. तो प्रतिस्पर्धी होता प्रवीण ठिपसे, वय वर्ष १५. हा खेळ बघणाऱ्या डॉ. सव्हेयर या महान खेळाडूने त्याच वेळी भविष्य वर्तवलं की, एक ना एक दिवस हा मुलगा ग्रॅण्डमास्टर होईल. त्यांचे हे बोल १९९७ साली खरे ठरले.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच बुद्धिबळ ऑलम्पियाड, एशियन टीम चॅम्पियनशिप, कॉमनवेल्थ अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकण्याचा प्रवीण ठिपसे यांचा सिलसिला सुरू होता. बुद्धिबळातील पराक्रमामुळे १९ व्या वर्षी छत्रपती पुरस्कार, २३ व्या वर्षी अर्जुन पुरस्कार आणि पंचविशीच्या आतच ग्रॅण्डमास्टर किताबासाठी पहिला परफॉर्मन्स असा त्याच्या प्रगतीचा आलेख उंचावत गेला. प्रवीण ठिपसे यांनी ग्रँडमास्टर हा किताब १९८४ साली मिळवला. प्रवीण ठिपसे यांची पत्नी भाग्यश्री साठे ठिपसे या महिला इंटरनॅशनल मास्टर आहेत.

●●●



## गोव्यात ६ मराठी माध्यमाच्या सरकारी शाळा बंद पडल्या

■ पणजी

**गोव्यातही** ७ सरकारी प्राथमिक शाळा बंद झाल्या आहेत. शाळेत एकही विद्यार्थी नसल्यामुळे या शाळा बंद करण्यात आल्या आहेत. या बंद झालेल्या शाळांमध्ये ६ मराठी माध्यमांच्या आणि १ कोकणी माध्यमाच्या शाळेचा समावेश आहे. या शाळा बंद करण्याचा आदेश शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांनी दिला आहे.

राज्यातील बंद पडलेल्या शाळांमध्ये दक्षिण गोव्यातील ५ शाळा, उत्तर गोव्यातील २ शाळांचा समावेश आहे. शून्य पटसंख्या असल्याने या शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०२२ पासून या शाळांमधील विद्यार्थ्यांचा आकडा कमी होत होता. सध्या एकही विद्यार्थी शाळेत उपलब्ध नसल्याने या शाळा बंद केल्या आहेत. एखाद्या शाळेत कमी विद्यार्थी असतील तर ती शाळा दुसर्या शाळेला जोडली जात होती. तरीही विद्यार्थी गळती काही थांबली नव्हती.

## बदलापूर स्थानकात प्रवाशांचा स्थानक व्यवस्थापकांना घेराव

■ बदलापूर

**बदलापूर** रेल्वे स्थानकात आज प्रवाशांनी स्थानक व्यवस्थापकांना घेराव घालत, सातत्याने उशिराने धावणाऱ्या लोकल गाड्यांबाबत जाब विचारला. नोकरदार वर्गाचे वेळापत्रक बिघडत असल्याने प्रवासी संतापले होते.

गेल्या काही दिवसांपासून बदलापूर येथे गाड्या १५ ते २० मिनिटे उशिरा येतात. एक लोकल उशिराने आल्यास त्यामागील गाड्याही उशिराने धावतात. याबाबत सूचना प्रवाशांना वेळेत दिली जात नाही. परिणामी प्रवाशांची संख्या वाढून लोकलमध्ये मोठी गर्दी होते.

प्रवाशांनी सांगितले की, लोकल गाड्या उशिराने येत असल्याची सूचना वेळेत दिली जात नाही. उद्घोषणांचा आवाज कमी असल्याने ती ऐकू येत नाही. त्यामुळे गोंधळ निर्माण होतो. सतत होणाऱ्या विलंबामुळे अनेकांवर नोकऱ्या गमावण्याची वेळ आली आहे. याबाबत प्रवाशांनी व्यवस्थापकांच्या कार्यालयात जाऊन त्यांच्याकडे लेखी उत्तर देण्याची मागणी केली. त्यामुळे काही काळ फलाट क्रमांक तीनवर गोंधळ झाला. अखेर रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना लेखी स्वरूपात उत्तर दिले.

## भ्रष्ट माशांचा बाजार! मत्स्यव्यवसाय विभागाला पत्रकारांचा धसका

**१५ दिवसांत कारवाई नसेल तर मुंबईत उपोषण**

■ उरण

**मत्स्यव्यवसाय** विभागात भ्रष्टाचाराची दुर्गंधी एवढी पसरली आहे की, नियम, कायदे आणि बंदी काळ या मंडळींसाठी फक्त कागदावरच शोभेच्या फिती आहेत. उरण तालुका मराठी पत्रकार संघ गेल्या अनेक महिन्यांपासून पावसाळी मासेमारी बंदी काळातील बेकायदेशीर मासेमारी व विभागातील भ्रष्ट कारभाराविरोधात आवाज उठवत आहे. पण, विभाग मात्र कानात तेल, डोळ्यांवर पट्टी लावून बसला आहे.

या निष्क्रिय व भ्रष्ट कारभाराविरोधात संघाने १५ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथील मत्स्यव्यवसाय विभाग मुख्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला होता. इशाऱ्याचा फटका बसताच आयुक्त किशोर तावडे यांनी तातडीची बैठक बोलावून तक्रारींवर त्वरित कारवाई करू, अशी गोड बोलण्याची हमी दिली. उपोषण स्थगित करण्याची विनंती विभागाने केली आणि पत्रकार संघाने त्यांचा मान राखून १५ दिवसांची मुदत दिली. मात्र हा वेळ गोड बोलून वेळ मारून नेण्यासाठी नाही, तर भ्रष्ट माशांच्या बाजारावर हातोडा मारण्यासाठी आहे, हे संघाने स्पष्ट केले. १५ दिवसांत कारवाई झाली नाही, तर आयुक्त ते सहायक आयुक्त सगळेच भ्रष्टाचाराचे पाठीराखे असल्याचे जनतेसमोर उघड केले जाईल आणि मग रस्त्यावरचा रणसंग्राम भडकणारच आहे. पत्रकार संघाच्या तक्रार अर्जानुसार संजय पाटील - सहाय्यक आयुक्त, सुरेश बागुलगावे - उरण परवाना अधिकारी, प्रदीप नाखवा - चेअरमन, करंजा मच्छीमार सोसायटी यांच्यावर तात्काळ कारवाई, मयताच्या नातेवाईकांना भरपाई आणि इतर सर्व तक्रारींवर कार्यवाहीसह अहवाल पत्रकार संघाला देणे हीच लोकशाहीतील खरी कसोटी असेल. आयुक्त किशोर तावडे यांनी योग्य ती आणि ठोस कारवाई केली नाही, तर उरण तालुका मराठी पत्रकार संघ पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार धारदार करून मैदानात उतरेल, असा इशारा संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू यांनी दिला.

## सुरवोईच्या सॉनिक बूममुळे दिंडोरीत गावकरी भयभीत

■ नाशिक

**दिंडोरी** तालुक्यातील लोकांना आज दुपारी जोरदार आवाज ऐकू आला. जवळपास २५ किमी परिसरात हा आवाज ऐकू आला. या आवाजामुळे जवळपासच्या घरांच्या काचा फुटून नुकसान झाले. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन भूकंप झाल्याची चर्चा रंगली. परंतु हा आवाज सुखोई विमानाचा सॉनिक बूम असल्याचे नंतर स्पष्ट झाले. हिंदुस्थान एअरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल)च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी सांगितले की, सुखोई विमानाचा सॉनिक बूममुळे हा आवाज येतो. विमान हवेत उडते त्यावेळी होणाऱ्या या आवाजामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

## कुर्ला मदर डेअरी बाधितांचे राज ठाकरे यांना निवेदन

■ मुंबई

**कुर्ला** मदर डेअरीमधील प्रकल्प बाधितांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी कुर्ला मदर डेअरीची २१ हेक्टर जागा वापरण्याच्या निर्णयाला स्थानिकांनी तीव्र विरोध आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी राज ठाकरेंची भेट घेऊन निवेदन दिले. राज्य सरकारने धारावीतील अपात्र रहिवाशांना घरकूल देण्यासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्पाला (डीआरपी) मुंबईतील विविध ठिकाणी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामध्ये कुर्ला परिसरातील हिरवळीने भरलेली मदर डेअरीची जागादेखील सामील आहे. मात्र, ही जागा सार्वजनिक उद्यानासाठी राखावी, अशी मागणी कुर्लावासीयांनी केली आहे.

## एसटी फेऱ्यांसाठी कुकटोळी ग्रामस्थांचा रास्ता रोको

■ सांगली

**कोरोना** साथीच्या काळात बंद करण्यात कवठे महांकाळ ते मिरजमार्गे कुकटोळीला जाणाऱ्या बसफेऱ्या पुन्हा सुरू कराव्यात, या मागणीसाठी कुकटोळी येथील ग्रामस्थांनी काल सकाळी 'रास्ता रोको' आंदोलन केले. त्यामुळे या रस्त्यावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. कोरोना महामारीपूर्वी सुरू असलेल्या सर्व फेऱ्या पुन्हा सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. कवठेमहांकाळ, खंडेराजुरी, मालगावमार्गे मिरजकडे बससेवा बंद झाल्याने कुकटोळी गाव पूर्णपणे बससेवेपासून वंचित झाले आहे. मिरज आणि कवठे महांकाळच्या सीमेवर असलेल्या या गावातील अनेक विद्यार्थी शिक्षण आणि इतर कामांसाठी मिरज, सांगली आणि पुणे, मुंबईसारख्या शहरांकडे जात असल्यामुळे या भागातील प्रवाशांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे सरपंच तानाजी यमगर, महेश देसाई, माजी सरपंच शिवाजी कारंडे यांच्यासह ग्रामस्थांनी हे रास्ता रोको आंदोलन केले. अखेर,आगार व्यवस्थापकांनी आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी हे आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात राजाराम पाटील, संजय चव्हाण, प्रकाश पाटील, रघुनाथ देसाई, सुभाष वाघमारे, मिलिंद देवकते, अनिल यमगर, प्रशांत निकम आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.



## सरकार आणण्यात हिंदूंचा हात मंत्री नितेश राणेंचे वक्तव्य

■ रत्नागिरी

**महायुती** सरकार सत्तेत आणण्यासाठी हिंदू समाजाचा मोठा वाटा आहे. अन्य धर्मीयांनी मतदान केले नाही. त्यामुळे हिंदू समाजाची सेवा करणे आणि त्यांचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे, असे वक्तव्य आज मंत्री नितेश राणे यांनी केले. ते रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे रक्षाबंधनानिमित्त आयोजित राखी संकलन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी नितेश राणे म्हणाले की,राज्यात लव्ह जिहादच्या घडवून आपल्या माता-भगिनींकडे वाकड्या नजरेने पाहिले जाते. पण मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे राज्यात कोणीही आमच्या महिला भगिनींकडे वाकड्या नजरेने पाहू शकत नाही. तसेच लव्ह जिहादसारख्या घटना घडू शकत नाहीत, ही भावना प्रत्येक बहिणीच्या मनात आहे. आज १४ हजार राख्या जमा केल्या असून त्या प्रत्येकापर्यंत पोहोचवल्या जातील. त्याचा परिणाम लवकरच दिसून येईल आणि हिंदुत्व अधिक भक्कम होईल. हिंदू म्हणून खांद्याला खांदा लावून काम करणे आवश्यक आहे. हिंदू समाजानेच आम्हाला सत्तेत बसवले आहे. त्यांचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे.

## चांदवडमध्ये २३ ऑगस्टला काँग्रेसची कांदा परिषद

■ नाशिक


**नाशिकच्या** चांदवड येथे २३ ऑगस्टला काँग्रेसतर्फे कांदा परिषद आयोजित करण्यात आली आहे. नाफेड आणि एनसीसीएफच्या कांदा खरेदी घोटाळ्याची चौकशी, तसेच कांद्याला हमीभाव मिळावा अशा काँग्रेसच्या मागण्या आहेत. यावरून या परिषदेत काँग्रेस केंद्र आणि राज्य सरकारवर निशाणा साधणार आहे. कांद्याला किमान ३ हजार रुपये प्रतिक्विंटल हमीभाव द्यावा, नाफेडच्या खरेदीतील भ्रष्टाचार आणि दलालीची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागण्या काँग्रेसने अर्थमंत्री निर्मला सीतारमण, पणन मंत्री पियुष गोयल, कृषी मंत्री यांच्यासह इतर मंत्र्यांकडे केल्या आहेत. मात्र त्याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी चांदवडमध्ये २३ ऑगस्टला काँग्रेस कांदा परिषद घेत आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी ही घोषणा केली.

## श्रावण मासानिमित्त चांदिवलीत भव्य कावडयात्रेचे आयोजन

■ मुंबई

**सालाबादप्रमाणे** यंदाही श्रावण महिन्यात चांदिवलीत भव्य कावडयात्रा काढण्यात आली. या कावडयात्रेला हिंदू बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कावड यात्रेत हर हर महादेव, बम बम बोले गजर दुमदुमत होता. चांदिवली विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली हिंदू संस्कृती व परंपरा जोपासण्यासाठी, भोले शंकराच्या जयघोषात व भगव्या वातावरणात ही कावडयात्रा काढण्यात आली. ही कावड यात्रा हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या डीजेच्या गाण्यांच्या तालावर, फटाक्यांच्या आतिषबाजीत शितल तलाव ते काजूपाडा पाईप लाईनमार्गे श्री शंभो महादेव मंदिरपर्यंत काढण्यात आली. या कावडयात्रेत हजारो उत्तर भारतीय महिला भगवी साडी परिधान करून श्री शंभो महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यासाठी घागर-कलश घेऊन सहभागी झाल्या होत्या. तसेच शेकडो पुरुष भगवे कुर्ते परिधान करून कावड घेऊन आले होते. यावेळी हिंदू देव-देवतांचे भगवान शंकर, श्रीराम, हनुमान आदी मूर्तींसह चलतचित्र देखावा उभारला होता. या कावडयात्रेसाठी तीर्थक्षेत्र काशीवरून खास पवित्र जल आणून श्री शंभो महादेव महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यात आला. भगवान श्री शंभो महादेवाच्या पिंडीवर तीर्थक्षेत्र काशीच्या जलाने अभिषेक करून चांदिवलीचा विकास करण्यासाठी ताकद मिळो, अशी प्रार्थना यावेळी आमदार लांडे करण्यात आली. या कावडयात्रेत माजी नगरसेविका शैला लांडे, युवासैनिक प्रणव लांडे, प्रयाग लांडे, उत्तर भारतीय संघ चांदिवलीचे पदाधिकारी अध्यक्ष रामप्रसिद्ध दुबे, सेक्रेटरी भास्कर सिंह, महिला तालुका अध्यक्ष सरिता मिश्रा आदीसह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वीकेण्डला काय बघाल ?

**स्वातंत्र्य दिवसाच्या निमित्ताने सिनेमागृहांमध्ये 'वॉर २' आणि 'कुली' सारखे चित्रपट प्रदर्शित झाले आहेत, तर ओटीटी प्लॅटफॉर्मवर देखील मनोरंजनाचा भरपूर खजाना या आठवड्यात उपलब्ध आहे. घरात बसून आपल्या कुटुंबीयांसह काही चांगले चित्रपट किंवा सीरिज पाहण्याचा तुमचा प्लान असेल, तर तुमच्याकडे रोमांचक, गुप्तहेर, क्शन आणि हॉररपासून राजकीय थ्रिलरपर्यंत अनेक पर्याय उपलब्ध आहेत.**

## चित्रपटगहांमध्ये काय ?




### वॉर २
हिंदी सुपरस्टार ऋतिक रोशनने पहिल्यांदाच दाक्षिणात्य सुपरस्टार ज्युनिअर एनटीआरसह काल प्रदर्शित झालेल्या वॉर २ मध्ये काम केले आहे, ज्युनिअर एनटीआरचा हा पहिला हिंदी चित्रपट आहे.





### कुली
'वॉर २' शी बॉक्स ऑफिसवर टक्कर देण्यासाठी काल भारताचे सुपरस्टार रजनीकांत यांचा 'कुली' हा चित्रपट चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित झाला आहे. रजनीकांत यांचे चाहते अनेक महिन्यांपासून या सिनेमाच्या प्रदर्शनाची वाट पाहत होते. लोकेश कनगराज दिग्दर्शित या सिनेमामध्ये आमिर खान एका जबरदस्त क्शन अवतारात दिसणार आहे. नागार्जुन, सत्यराज, श्रुती हसन, उपेन्द्र आणि नागार्जुन हे लोकप्रिय कलाकार देखील या सिनेमाचा हिस्सा आहेत.

## ओटीटीवर काय पहाल ?




### सारे जहां से अच्छा
अभिनेता प्रतीक गांधी अभिनित ही थ्रिलर सीरीज १३ ऑगस्टला नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. यामध्ये प्रतीकने विष्णू शंकर नावाच्या एका भारतीय गुप्तहेराची भूमिका केली आहे, जो आपल्या मिशनमध्ये सीमा पार करून शत्रूच्या परमाणू ठिकाणांना नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. ही सीरीज प्रेक्षकांच्या मनामध्ये देशभक्तीच्या भावना नक्कीच जागृत करेल. या सीरीजमध्ये प्रतीक गांधीसह सनी हिंदुजा, सुहैल नैयर, कृतिका कामरा, तिलोत्तमा शोम, अनूप सोनी आणि रजत कपूर यांसारखे नामवंत कलाकार आहेत.





### तेहरान
अभिनेता जॉन अब्राहमचा चित्रपट 'तेहरान' अनेक काळापासून प्रदर्शनासाठी अडकला होता. काल तो प्रदर्शित झाला आहे, मात्र ओटीटी प्लॅटफॉर्मवर. 'तेहरान' मध्ये राजनैतिक षडयंत्रांचा धोकादायक गोंधळ पाहायला मिळेल. हा चित्रपट काल झी ५ वर प्रदर्शित झाला आहे. रशिया आणि युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवरील आंतरराष्ट्रीय षडयंत्रामध्ये फसलेल्या एका भारतीय पोलीस अधिकाऱ्याची कथा यामध्ये पाहायला मिळेल. स्फोटाची पडताळणी करत असताना तो एका जाळ्यात अडकतो, ज्यामध्ये केवळ त्याचा जीव नव्हे तर देशाची सुरक्षा देखील धोक्यात येते. अरुण गोपालन द्वारे दिग्दर्शित या सिनेमामध्ये जॉन अब्राहमसह अभिनेत्री मानुषी छिल्लर आणि नीरू बाजवा यांच्या भूमिका देखील आहेत. जॉनने यामध्ये दिल्ली पोलीसमध्ये असलेल्या एसीपी राजीव कुमार यांची व्यक्तिरेखा साकार केली आहे.




### कोर्ट कचहरी
१३ ऑगस्टला सोनी लिववर कोर्ट कचहरी ही सीरिज प्रदर्शित झाली आहे. यामध्ये परमची कथा आहे, जो आपले वडील हरीश माथुर यांच्या आश्रयातून बाहेर येण्यासाठी संघर्ष करत आहे. रुचीर अरूण दिग्दर्शित या सीरिजची कथा पटकथा पुनीत बत्रा, अरुण झा, अरुनभ कुमार यांनी लिहिली आहे. पवन मल्होत्रा, आशिष वर्मा, पुनीत बत्रा आदि कलाकार यामध्ये आहेत.



### अंधेरा
तुम्हाला हॉरर चित्रपट-सीरिज आवडत असतील, तर ही सीरिज तुम्ही बघायला हवी. अंधेरा ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर काल १४ ऑगस्टला प्रदर्शित झाली आहे. यामध्ये अनेक रहस्यमय घटना प्रेक्षकांना पहायला मिळतील. ही एका हरवलेल्या मुलीची कथा असून तिची केस पोलीस अधिकारी कल्पना कदम आणि मेडिकल विद्यार्थ्याचा जय सोडवण्याचा प्रयत्न करतात. आठ एपिसोड असलेल्या या सीरिजचे दिग्दर्शन राघव डारनी केले आहे. अभिनेता-दिग्दर्शक फरहान अख्तरने या सीरिजची निर्मिती केली असून यामध्ये प्राजक्ता कोळी, सुरवीन चावला, प्रिया बापट आणि करणवीर मल्होत्रा आदि कलाकार आहेत.




### नाइट ऑलवेज कम्स
हा एक अमेरिकन क्राइम थ्रिलर चित्रपट आहे आणि आज हा सिनेमा नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. यातील कथा एका अशा मुलीवर आधारित आहे, जी सर्वस्व पणाला लावून आपले घर वाचवण्याचा प्रयत्न करते. हा चित्रपट हिंदीमध्ये देखील बघता येईल.



### एलियन: अर्थ
जिओहॉटस्टारवर १३ ऑगस्ट रोजी एलियन: अर्थ ही सीरिज प्रदर्शित झाली असून २१२० या काळातील कथा सांगते. ही सीरिज मूळ एलियन (१९७९) च्या घटनांच्या दोन वर्षांपूर्वीची प्रीक्वल आहे आणि जेनोमोर्फच्या धोक्याला पहिल्यांदा पृथ्वीवर घेऊन येते. यामध्ये एलेक्स लॉथर, सॅमुअल बेंकलिन, एस्सी डेव्हिस , बाबू सीसे इत्यादी कलाकार आहेत.




### बटरफ्लाय
ही सीरिज ओटीटी प्लॅटफॉर्म प्राइम व्हिडिओवर १३ ऑगस्टला प्रदर्शित झाली आहे. अमेरिकन गुप्तचर एजंट डेविड जंग दक्षिण कोरियामध्ये शांतपणे राहत असतो. परंतु भूतकाळ त्याचा पाठलाग सोडत नाही; एका क्रूर तरुण खुनी रेबेकाला त्याला मारण्यासाठी पाठवले जाते. दोघांमध्ये चांगलीच चकमक होते. परंतु कथेला कलाटणी मिळते जेव्हा त्याला समजते की, रेबेका त्याची मुलगी आहे.




### ड्रॉप
हा चित्रपट जिओहॉटस्टारवर ११ ऑगस्टला प्रदर्शित झाला आहे. एक सर्वसाधारण डेट लवकरच एका भयानक स्वप्नामध्ये बदलते, जेव्हा मुलीला एयरड्रॉपद्वारे अज्ञात आणि धमकीचे मेसेज मिळू लागतात. या चित्रपटात मेघन फाही आणि ब्रँडन स्केनारने काम केले आहे.




### जानकी वी वर्सेज स्टेट ऑफ केरळ
झी ५ वर आज भारतीय न्यायव्यवस्थेवर आधारित 'जानकी वी वर्सेज स्टेट ऑफ केरळ ' हा मूळ मल्याळम भाषेमध्ये बनलेला चित्रपट प्रदर्शित होत आहे. बंगळूर येथील एक आयटी व्यावसायिक जानकी विद्याधरनची कथा या सीरिजमध्ये पहायला मिळेल. लैंगिक शोषणामुळे तिला कायद्याची लढाई लढावी लागते. या चित्रपटाचे लेखन प्रवीण नारायणन यांनी केले असून यामध्ये सुरेश गोपी व अनुपमा परमेश्वरन यांच्या मुख्य भूमिका आहेत. हिंदीसह हा चित्रपट अनेक भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये पाहता येईल.

## नागार्जुनची व्यक्तिरेखा हॉलीवूडची कॉपी ?



थलाईवा रजनीकांत यांचा कुली हा सिनेमा कालच भारतभर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटामध्ये अभिनेता नागार्जुनचीही महत्त्वाची भूमिका आहे. त्याने या सिनेमामध्ये लोकी नावाच्या खलनायकाची भूमिका साकारली आहे. ही व्यक्तिरेखा हॉलीवूडच्या सर्वात आयकॉनिक व्यक्तिरेखांवर आधारित आहे. या चित्रपटाचा दिग्दर्शक लोकेश कनकराज हॉलीवूड दिग्दर्शक -पटकथा लेखक व निर्माता क्रिस्टोफर नोलनचा चाहता आहे. क्रिस्टोफरच्या 'द डार्क नाइट' या चित्रपटातील आयकॉनिक व्यक्तिरेखा जोकरवरून नागार्जुनच्या कपड्यांची शैली घेतली आहे. या सिनेमामध्ये जोकरची व्यक्तिरेखा दिवंगत अभिनेता हीथ लेजरने साकारली होती. त्याच्या या भूमिकेला आणि त्याच्या भयानक हास्यावर आजही लक्ष ठेवले जाते. कुलीमध्ये नागार्जुनच्या पोषाखासाठी अधिकतर जांभळा आणि क्रीम रंगाचा वापर करण्यात आला आहे, जो त्याच्या भूमिकेला व्याप्ती देण्यास मदत करतो. लोकीच्या व्यक्तिरेखेमध्ये लोकेश कनकराजला एक सणकीपणा हवा होता. म्हणून त्याने कपड्यांचे हे रंग निवडले.

## पुरुषांसारखे स्नायू आहेत...

'सन ऑफ सरदार २' फेम अभिनेत्री मृणाल ठाकूरचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. मात्र हा व्हिडिओ त्यावेळचा आहे, जेव्हा मृणाल टीव्ही मालिकांमध्ये काम करत होती. सदर व्हिडिओमध्ये तिने अभिनेत्री बिपाशा बासूची खिल्ली उडवली होती. तिने बिपाशाला पुरुषी असे म्हणत सांगितले होते की, मी बिपाशापेक्षा लाख गुणे चांगली आहे. बिपाशाचे पुरुषांसारखे स्नायू आहेत. आता हा व्हायरल झालेला व्हिडिओ बिपाशाच्या बघण्यात आला आणि तिने मृणालला सडेतोड उत्तर देत म्हटले आहे की, स्वतःवर प्रेम करा, मजबूत बना. बिपाशाने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी पोस्ट करत लिहिले आहे की, मजबूत महिला एकमेकांना वरती आणतात. बिपाशाचे हे उत्तर वाचून मृणाल पुन्हा तिच्या वाटेला जाईल असे वाटत नाही.






# शोले ची... पन्नाशी

अनिता पाध्ये , सिने अभ्यासक व लेखिका

*शोले प्रदर्शित होऊन आज तब्बल ५० वर्षे झाली. मात्र आजही या चित्रपटाची जादू सिनेरसिकांच्या मनामध्ये कायम आहे. तथापि, आज आयकॉनिक आणि अद्भूत म्हटल्या जाणाऱ्या या सिनेमाला पहिल्याच दिवसापासून प्रेक्षकांचे मन मिळाले नव्हते. शोले प्रदर्शित झाल्यानंतर पहिले पाच-सहा दिवस या चित्रपटाला प्रेक्षकांचा अतिशय थंड प्रतिसाद लाभला होता. चित्रपट पडला असं चित्रपटसृष्टीमध्ये बोललं जाऊ लागलं होतं. परंतु जादूची कांडी फिरवावी तसं अचानक शोलेला प्रेक्षक मिळू लागले आणि बघता बघता या सिनेमाने इतिहास घडवला. मुंबईच्या मिनर्व्हा चित्रपटगृहामध्ये पाच वर्ष शोले चालला होता. या आयकॉनिक सिनेमाच्या या सुवर्णमहोत्सवानिमित्त शोलेचे काही मजेदार किस्से व रंजक माहिती...*



- शोलेमध्ये जे कलाकार प्रेक्षकांना दिसतात, ते चित्रपटाच्या निर्माता-दिग्दर्शकाचे प्रथम प्राधान्य नव्हते. गब्बरच्या भूमिकेसाठी सुरुवातीला अभिनेता प्राण यांचे नाव सिप्पी पिता-पुत्राच्या डोळ्यासमोर आले होते. परंतु नंतर अभिनेता डॅनीला देण्यात आले. त्यावेळी डॅनी धर्मात्मा या फिरोज खान यांच्या चित्रपटात काम करण्यासाठी अफगाणिस्तानला जाणार होते. त्यामुळे शोलेच्या शूटिंगसाठी तारखा देणे त्यांना शक्य झाले नाही आणि त्यांनी चित्रपट सोडला. मग सलीम-जावेद या जोडीने अभिनेता अमजद खान यांचे नाव सुचवले. अमजद खान तेव्हा नाटकांमध्ये अभिनय करत असत.
- शोलेचे निर्माता जे.पी. सिप्पी यांची इच्छा होती की, जयची भूमिका अभिनेता शत्रुघ्न सिन्हा करावी. परंतु हा मल्टीस्टारर चित्रपट असल्याने शत्रुघ्न सिन्हा यांनी या सिनेमात काम करण्यास नकार दिला. अमिताभ बच्चन त्यावेळी सिनेसृष्टीमध्ये नवीनच होते. त्यांचे नाव निर्मात्याला सुचवल्याचा दावा धर्मेंद्र आणि सलीम-जावेद देखील करतात. त्यांच्यापैकी खरे कोण, हे त्यांनाच माहिती. सलीम खान यांच्यामते त्यांनी खास आपल्या पैशांनी जंजीरची ट्रायल आयोजित करून अमिताभ बच्चन यांचे काम त्यांना दाखविले होते.
- ठाकूरची भूमिका दिलीप कुमार यांनी करावी अशी सलीम-जावेद यांची इच्छा होती, परंतु दिलीप कुमार यांनीही त्याच कारणासाठी चित्रपट सोडला, ज्यामुळे शत्रुघ्न सिन्हा नकार दिला होता.
- ३ ऑक्टोबर १९७३ रोजी शोलेचे शूटिंग सुरू झाले. जयला राधा किल्ल्या देते (जया भादुरी व अमिताभ




बच्चन) हा चित्रित झालेला पहिला सीन.
- चित्रपटाचे बजेट वाढण्याची व चित्रपट तयार होण्यासाठी अडीच वर्ष लागण्याची अनेक कारणे होती.. चित्रपटात संजीवकुमार, धर्मेंद्र, अमिताभ बच्चन आणि अमजद खान या चार प्रमुख व्यक्तिरेखा असल्यामुळे शूटिंगसाठी सर्व कलाकारांच्या एकत्र तारखा मिळणं आवश्यक होतं. अमिताभ बच्चननी अनेक चित्रपट साइन केले होते आणि ते त्या सिनेमांच्या शूटिंगमध्ये व्यस्त होते. धर्मेंद्र आणि हेमा मालिनीना देखील अन्य चित्रपटांच्या तारखा सांभाळत शोले साठी तारखा द्याव्या लागत होत्या. सिनेमाचे शूटिंग मुंबई बाहेर असल्याने शिफ्टमध्ये काम करणे शक्य नव्हते. त्यातच चित्रपट सुरू झाल्यावर चार महिन्यांनी अमिताभ बच्चन आणि जया भादुरी यांचा विवाह झाला, त्यामुळे देखील सिनेमाचे शूटिंग पुढे ढकलले गेले.
- सिनेमातील अनेक दृश्ये रमेश सिप्पी पुन्हा पुन्हा चित्रित करत होते. ये दोस्ती, हम नहीं... हे पाच मिनिटांचे गाणे चित्रित करण्यासाठी २१ दिवस लागले. या गाण्यामध्ये अमिताभ बच्चन शिट्टी वाजवतात ,ती आर.डी.बर्मन यांचे वादक मनोहारी सिंग यांनी वाजवली आहे.
- राधा दिवे लावते ही दोन लहान दृश्ये चित्रित करताना लाइटची समस्या येत असल्यामुळे २० दिवसांत तो सीन चित्रित झाला होता. एक दृश्य, ज्यामध्ये गब्बर इमामच्या मुलाची हत्या करतो, हा सीन चित्रित करायला १९ दिवस लागले. ट्रेनमधील चोरी चित्रित केली होती, पुणे-मुंबई मार्गावरील पनवेल येथे ७ आठवड्यात चित्रित झाला होता.
- शोलेची अधिकतर शूटिंग बंगलोरच्या जवळील रामनगर येथील खडकांजवळ चित्रित करण्यात आले आहे. सेट व्यवस्थित शूटिंग स्थळी नेण्यासाठी बंगलोर हायवेवरून राजनगरला जाणारा पक्का रस्ता तयार करावा लागला होता. कला दिग्दर्शक राम येडेकर यांनी या रामनगर परिसरात सेटच्या साह्याने एक कत्रिम गाव तयार केले होते. राजकमल स्टुडिओमधील एल जेलचा सेट तयार करण्यात आला होता. नंतर काही काळासाठी रामनगरच्या एका भागाला दिग्दर्शक रमेश सिप्पी यांच्या सन्मानार्थ सिप्पी नगर हे नाव देण्यात आले. तिथल्या ज्या खडकाळ परिसरात चित्रपटाचे शूटिंग झाले होते, ते २०१० मध्ये शोले चे पर्यटन स्थळ म्हणून पर्यटकांसाठी उपलब्ध करण्यात आले.
- या सिनेमामध्ये रोमांस होता तो फक्त वीरू आणि बसंतीचा. हा सिनेमा सुरु होण्यापूर्वीच धर्मेंद्र हेमा मालिनीच्या प्रेमात पडले होते. या सिनेमाच्या निमित्ताने त्यांना हेमाच्या जवळ येण्याची एक उत्तम संधी मिळाली होती. जंगलात बसंतीला नेम धरुन बंदुकीने आंबे तोडायचा शिकवतात हा सीन चित्रित करत असताना काही ना काही कारण सांगत धर्मेंद्र पुन्हा पुन्हा रिटेक्स करत होते, जेणेकरुन हेमा मालिनीशी सलगी करता यावी. यासाठी पैशांचे आमिष दाखवून त्यांनी दोन एक स्पॉटबॉईजना आपल्या कटामध्ये सामील करुन घेतले होते. ते स्पॉटबॉईज कधी रिफ्लेक्टर खाली पाडून ट्रॉली चालवण्यात विघ्न आणत असत तर कधी अन्य काही चूक करत असत, ज्यामुळे सीन कट करावा लागत असे. चित्रपट पूर्ण होईपर्यंत या सर्व रिटेक्सवर धर्मेंद्र यांनी तब्बल २० हजार रुपये खर्च केले होते.
- या चित्रपटाचा शेवट वेगळा चित्रित करण्यात आला होता. मूळ पटकथेप्रमाणे चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये ठाकूर गब्बरला जीवे मारतो असे दाखवण्यात आले होते. परंतु गब्बरचा मृत्यू आणि इमामच्या मुलाची हत्या असलेली दृश्ये सेन्सॉर बोर्डाने कापायला सांगितल्यामुळे हे सीन पुन्हा चित्रित करुन शेवटी गब्बरला जीवंत ठेवण्यात आले. सेन्सॉर बोर्डा च्या मते अशा हिंसक दृश्यांमुळे समाजातील व्यक्ती आपल्या हातात कायदा घेतील.
- शोले तील प्रमुख कलाकारांना मिळालेल्या मानधनाबद्दल. धर्मेंद्रना १ लाख ५० हजार, अमिताभ बच्चनना १ लाख, संजीव कुमारना १ लाख २५ हजार तर अमजद खानना फक्त पन्नास हजार रुपये मानधन मिळाले होते. अभिनेत्री हेमा मालिनीना ७५ हजार रुपये तर जया बच्चनना केवळ ३५ हजार रुपये मोबदला मिळाला होता.


# नवाकाळ शब्दकोडे-१३४३

**आडवे शब्द –**

१. उजेड, मुलींचे एक नाव ३. प्राप्ती, फायदा ४. बाहेरगावच्या प्रवाशांसाठी धर्मशाळा १०. जीभ, रसना ११. वेडीवाकडी व्यसने करणारा १४. भजनाच्या वेळी वाजवले जाणारे एक वाद्य १५. दयेची याचना करणे १८. घेतलेले रीतसर परत करणे २१. दामिनी २३. नवऱ्याचा भाऊ २४. तुळईला आधार देणारा खांब २६. न बोलणारा २७. कमीज, पैरण २८. फुटपाथवरील दुकान किंवा पथारी २९. विष ३१. अनेक, कितीतरी ३२. फोडणीतील एक सुगंधी पदार्थ ३३. आगामी ३४. वगळलेले, वर्जित ३५. बूज, आदर ३६. अटन, प्रवास ३८. चिकार, पुष्कळ ४०. पैठणचे संत ४२. प्रहार ४४. समीक्षक ४६. वायू ४७. किरकोळ, सामान्य ४८. झेप ४९. अतिवृष्टीचा नदीवर परिणाम ५१. वनात वावरणारा ५४. ऐट, तोरा ५५. उगवती, प्राची ५६. बारा डझन ५७. सोने ५८. आचारी ६०. चारित्र्य ६२. नशा आणणारे, मादक ६३. पुणे शहराचे जुने नाव ६५. लीलया ६७. उद्यान, बाग ६९. बसण्याची लाकडी फळी ७०. कणसे बडवण्याचा लाकडी हातोडा ७१. पोळी-भाकरी भाजण्याचा पत्रा ७२. नुकसान ७४. शेपूट ७५. नव्या पालवीचा ऋतू ७७. श्रीफळ ७८. उदर ७९. कपाळभर लावलेले कुंकू ८१. मठ्ठ्याबरोबर खाल्ला जाणारा गोड पदार्थ ८२. कुटुंबात पिढ्यानपिढ्या पूजले जाणारे ठराविक दैवत ८४. रमलेला ८५. गमन, प्रयाण ८६. दयामाया ८८. मिठी ८९. अस्वल ९१. दरोडा ९३. प्रचलित ९४. दोस्त ९५. जाईचे फूल ९७. रेती ९८. हळवा, व्याकूळ १००. मऊ कापडाचा प्रकार १०२. पळपुटा १०६. लढा, झुंज १०७. अजून १०८. वरचष्मा ११०. हजारो १११. कमळात जन्मलेली, लक्ष्मी ११२. फक्त पुस्तकी ज्ञान असलेला

**उभे शब्द –**

१. खूप मोठे २. हिस्सेदारी ३. भूतबाधा ५. अपरा, खुजा ६. हरणाची एक जात ७. नंतर ८. लग्नानंतर नवविवाहितांनी कुलदैवताचे दर्शन घेणे ९. निदान एकदा तरी १०. जगणे १२. गंभीरपणे घेऊ नये असा १३. शुभ्र, श्वेत १६. सूची, जंत्री १७. पृथ्वी १९. छायाचित्र, छबी २०. बेडकांचे ओरडणे २२. जतन २५. पुडाची वडी २६. पौष्टिक कडधान्यविशेष ३०. प्रसन्न चेहऱ्याचा ३१. धुंदी ३२. खिन्न, कष्टी ३५. रस्ता ३६. मित्र, स्नेही ३७. बेरोजगार ३९. जंगली रेडा ४०. सारांश, तात्पर्य ४१. वैद्य हिच्यावरून रोगनिदान करतात. ४३. फुलांची-फळांची टोपली ४५. रुई ४७. आईचा भाऊ ४८. एक अप्सरा, पुरुरव्याची प्रेयसी ५०. लहानशी ५२. नयन ५३. घट्ट बासुंदी ५४. उशीर ५७. कुसुम ५९. आकाश ६१. लाडिक ६२. जमीन, भूमी ६३. हलक्या आवाजात स्वतःशी बोलणे ६४. नवरी ६६. विष्णू ६८. उषःकाल ७०. लिंबाच्या वर्गातले मोठे व गोड फळ ७१. ताजेपणा, तजेला ७३. उशीचे कव्हर ७५. वर्तुळ, रिंगण ७६. रोमांच ७७. नौका ७८. शाहिराचे स्फूर्तीदायक कवन ७९. रगेल, गर्विष्ठ ८०. उणे ८१. काळीज ८३. नशिबावर हवाला ठेवणारा ८७. गणपतीचे एक नाव ९०. जुगार ९२. चुलता ९४. दिवसाचा आठवा भाग ९५. हुशारी ९६. नम्र ९९. काळोखी रात्र १००. रेषा १०१. मथळा १०२. आजोबांचे वडील १०३. वात्रट, फाजील १०४. ख्रिस्ती प्रार्थनास्थळ १०५. दिवस १०६. मोका १०७. खोटा आरोप १०८. मिठाईवरचा आकर्षक सोनेरी-चंदेरी वर्ख १०९. स्वतः •



**नवाकाळ कोडे क्रमांक १३४२चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. स्वेद २. अवसर ५. कृतांत ७. चोखंदळ ९. पृच्छा १०. अजागळ ११. आकाश १३. टवळी १५. निदर्शन १७. ईडलिंबू १९. सबंध २०. उदक २१. प्रवृत्त २२. वृक २४. रग २६. सदन २७. हत्ती २८. साक्षरता ३०. नजराणा ३२. प्रहार ३४. पय ३५. भरत ३७. ठक ३८. सामोरा ३९. वेदी ४०. नरद ४३. वळेसर ४५. हळद ४६. शोष ४७. खवचट ४९. सरसू ५०. ठेका ५२. अनवट ५३. नजीक ५५. वदन ५७. कुवत ५८. काटकसर ६१. टुमणे ६३. फाजील ६५. चवली ६७. सैतान ७०. लक्ष्य ७१. असफल ७३. नतद्रष्ट ७४. भोचक ७५. तनया ७८. पान ७९. साजणी ८०. पटवारी ८१. दूर ८२. कलश ८५. अश्रूपात ८८. डेग ८९. तडकसार ९१. रानटी ९३. चिंधी ९४. छटाक ९६. क्षर ९७. चकवा ९९. पटका १०१. काषाय १०३. मेढे १०४. रडारड १०५. परागकण १०६. माशी १०७. प्रलय

**उभे शब्द** : १. स्वेच्छानिवृत्ती २. अजानवृक्ष ३. वग ४. सळई ५. कृश ६. तटबंदी ७. चोळी ८. दध्योदन १०. अर्श ११. आलिंगन १२. काबू १४. वध १६. दत्त १८. डर २०. उदर २१. प्रहसन २३. करभ २५. बराक २६. सहारा २८. साय २९. तारवट ३१. जठर ३२. प्रमोद ३३. नंदी ३४. पद ३६. तळे ३८. साळसूद ३९. वेष ४१. रतनबाव ४२. गाव ४४. सहजी ४५. हरवणे ४६. शोकाकुल ४७. खटका ४८. चमक ५१. अंतरा ५३. नर ५४. कटुता ५६. नफा ५९. टक्के ६०. सर्रास ६२. मनन ६४. जीन ६५. चळत ६६. लीलया ६७. सैल ६८. इंद्रजाल ६९. नाचणी ७१. अनवाणी ७२. फत्ते ७४. भोजनकक्ष ७६. नक्राश्रू ७७. पाट ७८. कोरडे पाषाण ८०. पतन ८३. शतक ८४. खूर ८५. अगोचर ८६. पारावार ८७. आधी ९०. सारमेय ९२. टीप ९३. चिंकारा ९५. टापशी ९८. कडा १००. टप १०१. काक १०२. विप्र

## निवडणूक आयोगाचा कारनामा!
# संन्याशाच्या पोटी पन्नास मुले

पान ८ वरून

या वृत्तामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. स्वामी रामकमल यांच्या तथाकथित मुलांच्या नावांची यादीच सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. त्यानुसार स्वामींच्या सर्वात धाकट्या मुलाचे नाव राघवेंद्र दास आहे. तो २८ वर्षांचा आहे. तर सर्वात मोठ्या मुलाचे नाव बनवारी दास असून तो ७२ वर्षांचा आहे, अशी नोंद मतदार यादीमध्ये दिसत आहे.

मतदार यादीतील या गंभीर चुकीवरून राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाला धारेवर धरले आहे. एका व्यक्तीचे नाव पिता म्हणून अनेक वयोगटातील ५० मतदारांच्या नावामध्ये सामील असणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. यावरून मतदार याद्यांमध्ये निवडणूक आयोग वाट्टेल तशा नोंदी करत आहे, हे उघड आहे, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मारूफ खान यांनी केली. अशा गंभीर चुका वाराणसीमध्ये होऊ शकतात तर इतरत्र का झाल्या नसतील, असा सवालही मारूफ यांनी उपस्थित केला. काँग्रेसने या मतचोरीवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## उबाठा-मनसे एकत्र येताच
# बेस्ट पतपेढीची चौकशी होणार

पान १ वरून

या आर्थिक वर्षातील कारभाराची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या नऊ वर्षांपासून ठाकरेंच्या शिवसेनेची या पतपेढीवर सत्ता होती. मात्र, गेल्या वर्षभरातील कारभारात अनियमितता असल्याच्या तक्रारी आल्याने या कालावधीतील सर्व आर्थिक व्यवहारांची तपासणी केली जाणार आहे.

यासाठी द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून गजानन गायकवाड आणि जितेंद्र चटर्जी यांची चौकशीसाठी नियुक्ती झाली आहे. या समितीला २९ ऑगस्टपर्यंत अहवाल सादर करायचा आहे.

## जैन आंदोलकांवर कारवाई करा
# राज ठाकरे पहिल्यांदाच बोलले

पान १ वरून

आधी हिंदीचा मुद्दा काढून पाहिला. आता त्यानंतर त्यांनी कबुतरे आणली आहेत. इथून पुढे कोणते प्राणी आणतील ते माहीत नाही.

सध्या विरोधकांकडून होत असलेल्या मतचोरीच्या आरोपांबाबत ते म्हणाले की, मतदारयाद्यांमध्ये घोळ असल्याचे मी २०१६-१७ सालापासून बोलत आहे. बाकीचे आत्ता बोलायला लागले आहेत. मुंबई महानगरपालिकेतील मतदार याद्यांची पुनर्तपासणी झाली पाहिजे. आमची लोक ही मतदार याद्यांची तपासणी करत आहेत.

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी आज मुंबईतील नेते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रत्येक मतदारयादी काळजीपूर्वक तपासण्याचे, त्यावर बारीक लक्ष ठेवण्याचे आणि संभाव्य घोटाळे टाळण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, मुंबईत तळागाळात केवळ उबाठा आणि मनसे हेच दोन पक्ष मजबूत असल्याचेही त्यांनी म्हटले.

### १५ ऑगस्टला मांसविक्री दुकाने चालू ठेवणार

स्वातंत्र्यदिनी राज्यातील काही महापालिकांनी मांसविक्रीवर बंदी घातली आहे. याविषयी बोलताना राज ठाकरे म्हणाले की, मी आमच्या लोकांना चिकन-मटणाची दुकाने चालू ठेवा असे सांगितले आहे. मांसविक्री बंद करण्याचा अधिकार महापालिकेला नाही. कोणी काय खावे आणि काय खाऊ नये, हे ठरवणे सरकार किंवा पालिकेचे काम नाही. स्वातंत्र्यदिनीच लोकांना खाण्याचे स्वातंत्र्य न देणे हा विरोधाभास आहे. स्वातंत्र्य म्हटल्यानंतर तुम्ही बंदी कशी आणू शकता? याबाबतचा कायदा १९८८ साली आणल्याचे बोलत आहेत. कायदा कधीही आणला असला, तरी स्वातंत्र्यदिनी आपण लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहोत. कोणत्याही सरकारने या गोष्टीचा विचार केला पाहिजे.

**सार्वजनिक सूचना**
**परिशिष्ट - १६ नुसार**
**(सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या उपविधी क्र. ३४ अंतर्गत)**

सुरुवातीस, **श्री. प्रमोदकुमार आर. सिंग** (श्री. प्रमोदकुमार रामकृष्णा सिंग) (श्री. प्रमोद रामकृष्णा सिंग) हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेअंतर्गत परिशिष्ट- २ च्या अनुक्रमांक १७ (झो.पु.प्रा.क्र. ९७) नुसार पात्र झाले व सदर योजना मेसर्स. आर. टी. कंस्ट्रक्शन ने राबवली आणि मेसर्स. आर. टी. कंस्ट्रक्शन दिनांक १८/१०/२००८ रोजीच्या ताबापत्रानुसार **श्री. प्रमोदकुमार आर. सिंग** (श्री. प्रमोदकुमार रामकृष्णा सिंग) (श्री. प्रमोद रामकृष्णा सिंग) यांना नव्या बांधलेल्या इमारतीत निवासी **फ्लॅट क्र. ५०७**, २२५ चौरस फूट कार्पेट, ५ वा मजला, **साईधाम एस.आर.ए. सह. गृह. संस्था मर्यादीत**, इमारत क्रमांक ०२, जी-८, छत्रपती संभाजी नगर, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९ चा ताबा दिला. (येथून पुढे **"सदरचा फ्लॅट"** असे संबोधण्यात येईल.

पुढे, **श्री. प्रमोदकुमार आर. सिंग** (श्री. प्रमोदकुमार रामकृष्णा सिंग) (श्री. प्रमोद रामकृष्णा सिंग) यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता दिनांक १५/०४/२०२५ रोजी निधन झाले व त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी **(१) श्रीमती. बिंद्र प्रमोद सिंग**, त्यांची मुलगी **(२) श्रीमती. सपना कुलदीप सिंग**, त्यांची मुलगी **(३) श्रीमती. ज्योती आझाद सिंग**, त्यांचा मुलगा **(४) श्री. चंदन प्रमोद सिंग** आणि त्यांचा मुलगा **(५) श्री. सुरज प्रमोद सिंग** हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत.

तद्नंतर, **श्रीमती. सपना कुलदीप सिंग** आणि **श्रीमती. ज्योती आझाद सिंग** यांनी त्यांना वारसाने आलेले त्यांचे सदर फ्लॅट मधील प्रत्येकी २०% हक्क, शीर्षक, भाग आणि अधिकार दिनांक ११/०८/२०२५ रोजीच्या हक्कसोड पत्र द्वारे **श्रीमती. बिंद्र प्रमोद सिंग, श्री चंदन प्रमोद सिंग** आणि **श्री. सुरज प्रमोद सिंग** यांच्या नावे सोडून दिलेले आहेत. सदरचे हक्कासोड पत्र हे नोंदणीकृत असून ज्याचा नोंदणी क्र. मबई१२-१४४५०-२०२५ असा आहे.

आता, **श्रीमती. बिंद्र प्रमोद सिंग, श्री. चंदन प्रमोद सिंग** आणि **श्री. सुरज प्रमोद सिंग** यांनी सदर फ्लॅट आणि शेअर्स मधील त्यांचा तिघांचा मिळून १००% हक्क, शीर्षक, भाग आणि अधिकार त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला आहे.

सदर संस्था याद्वारे मयत **श्री. प्रमोदकुमार आर. सिंग** (श्री. प्रमोदकुमार रामकृष्णा सिंग) (श्री. प्रमोद रामकृष्णा सिंग) यांच्या इतर वारस किंवा कायदेशीर वारस किंवा इतर दावेदार/आक्षेप घेणार्‍यांकडून **१४ (चौदा)** दिवसांच्या कालावधीत सदर नोटीसचे प्रकाशन झाल्यापासून सोसायटीच्या भांडवली/ मालमत्तेतील मृत सदस्याचे उक्त शेअर्स आणि हक्क हस्तांतरित करण्यासाठी दावे किंवा आक्षेप आमंत्रित करते. सदरच्या दावेदारांनी दाव्याच्या/ आक्षेपांच्या समर्थनार्थ आणि सोसायटीच्या हक्काच्या मालमत्तेतील मृत सदस्याच्या हक्क हस्तांतरणासाठी त्यांच्याजवळ असलेले कागदपत्रांच्या प्रती आणि इतर पुराव्यांसह संस्थेला कळवावे. वरील विहित कालावधीत कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटीच्या उपनिधीनुसार प्रदान केल्याप्रमाणे सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सदस्याचे शेअर्स आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास सोसायटी मुक्त असेल.

ठिकाण : मुंबई दिनांक : १५/०८/२०२५
**साईधाम एस.आर.ए. सह. गृह. संस्था मर्यादीत**
सही/-
**अध्यक्ष/सचिव**
इमारत क्रमांक ०२, जी-८, छत्रपती संभाजी नगर, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९

# बीडीडी पुनर्विकासाचा पहिला टप्पा! रहिवाशांना चाव्या सुपूर्द

पान १ वरून

प्लम्बिंग फिटिंग्ज, तसेच इमारतींमध्ये अग्निरोधक यंत्रणा, तीन लिफ्ट (त्यात १ स्ट्रेचर लिफ्ट, १ फायर लिफ्ट) देण्यात आल्या आहेत. माटुंग्यातील यशवंत नाट्यमंदिर येथे झालेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीडीडी चाळीने अनेक सामाजिक आंदोलने बघितली. स्वातंत्र्यांची चळवळ बघितली. बीडीडी चाळीचा विकास झाला पाहिजे, अशी मागणी वारंवार होत होती. महायुतीचे सरकार आले तेव्हा बीडीडी चाळीचा मुद्दा पहिल्यांदा ऐरणीवर घेतला. यामध्ये अनेक अडचणी आल्या. त्याचे ग्लोबल टेंडर काढले. वरळीमध्ये टाटा, एलएनटीने हे काम घेतले. अतिशय चांगले स्पेसिफिकेशन यामध्ये टाकले. सर्व अडचणींवर मात काढत अत्यंत वेगाने आपण या कामाला सुरुवात केली आणि आज लोकांना घरे दिली. मुंबईबाहेर गेलेल्या मुंबईकरांना मुंबईत आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही पोलिसांना १५ लाखांत घर देणार आहोत. अभ्युदय नगर, अंधेरीतील प्रकल्प, जे.बी. नगर प्रकल्पदेखील आम्ही राबवत आहोत. धारावी पुनर्विकास प्रकल्प सुरू केला आहे. एकूण १० लाख लोकवस्तीचा आम्ही पुनर्विकास करत आहोत. मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींपैकी अनेक वसाहतींचा पुनर्विकास होणार आहे. मुंबईमध्ये सोन्यासारखीच घरांची किंमत आहे. त्यामुळे ती घरे विकू नका. एकनाथ शिंदे म्हणाले की, देशभरातील लोक बीडीडी चाळीत राहतात. नव्याने बांधलेल्या घरातील प्रत्येक कोपऱ्याचा योग्य पद्धतीने वापर करण्यात आला आहे. तीन ते चार पिढ्यांपासून बीडीडी चाळीतील लोक घराचे स्वप्न पाहत होते. त्यांना आता दिलासा मिळाला आहे. अजित पवार म्हणाले की, बीडीडी चाळ म्हणजे मिनी भारत आपल्याला इथे पाहायला मिळत आहे. शासनाच्या धोरणांमुळे रखडलेले पुनर्विकासाचे प्रकल्प पूर्ण होतील. चांगले फ्लॅट मुंबईकरांना मिळालेले आहेत. चाळीतून टॉवरमध्ये गेलात तरी आपली संस्कृती तुटू देऊ नका. सगळे आयुष्य तुम्ही इथे जगलात, हे घर तुमचे आहे. कोणत्याही मोहाला बळी पडू नका. कोणीही घर विकू नका आणि मुंबईबाहेर जाऊ नका. आपला मुंबईकर मुंबईतच राहिला पाहिजे.

**भाषणाची संधी न दिल्याने आदित्य ठाकरे गैरहजर**

बीडीडी चाळ पुनर्विकास कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित होते. मात्र, निमंत्रण पत्रिकेत नाव असूनही स्थानिक आमदार आदित्य ठाकरे या कार्यक्रमाला अनुपस्थित राहिले. आदित्य ठाकरे यांना भाषणाची संधी देण्यात आली नाही. त्यामुळे ते नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. उबाठा नेते आ. वरुण सरदेसाई म्हणाले की, आम्ही विरोधक आहे म्हणून डावलण्यात येत आहे, अशी यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**विविध प्रकल्पांचे उद्घाटन-लोकार्पण**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडले. याशिवाय सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोड (भाग-१) चे लोकार्पण, मुंबई डब्बेवाला आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्राचे उद्घाटन, मालवणी येथील कर्मचारी निवासी इमारतींचे उद्घाटन, मुंबई मेट्रो प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन, कलानगर उड्डाणपूल डी आर्मचे उद्घाटनही आज पार पडले.

# सुप्रीम कोर्टाची तातडीची सुनावणी

पान १ वरून

पकडणे सुरू झाले आहे. पण शेल्टर होम नसल्याने त्यांना कुठे नेऊन सोडत आहेत ते समजत नाही. शिवाय त्यांना शेल्टर होमला नेऊन परत आणायचे नाही हे अन्यायकारक आहे. त्यांना परत का आणायचे नाही? त्यांची नसबंदी व्यवस्थित केली तर त्यांची संख्या वाढणार नाही. याकडे लक्ष द्यायला हवे. आधी शेल्टर होम उभारणे गरजेचे आहे. कुत्रे चावतात हे वेदनादायक आहे, पण त्याने रेबिज रोग होतो असे नाही. २०२२ पासून आता २०२५ पर्यंत दिल्ली, गोवा, राजस्थान या राज्यांत रेबिजचा एकही रुग्ण आढळलेला नाही. तेव्हा आमची विनंती आहे की, कुत्र्यांसाठी शेल्टर होम उभारून होईपर्यंत निकालाची अंमलबजावणी स्थगित करा. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाचा निकाल राखीव ठेवला आहे.

## मतदार अधिकार यात्रा

पान १ वरून- १७ ऑगस्टपासून बिहारमधून वोटर अधिकार यात्रा सुरू होत आहे. या यात्रेच्या माध्यमातून आपण लोकशाही, संविधान आणि वन मॅन, वन व्होट या तत्त्वाच्या रक्षणासाठी निर्णायक लढा सुरू करत आहोत. या यात्रेचा उद्देश केवळ निवडणूक सुधारणा नव्हे तर लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करणे आहे. या माध्यमातून स्वच्छ आणि पारदर्शक मतदार यादी तयार करू. युवक, कामगार, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांनी या जनआंदोलनात सहभागी व्हावे.

**न्यु हरि ॐ सहकारी गृहनिर्माण संस्था (रजि.)**
रजि. नं. एम. यु. एम./ एम. एम. आर. डी. ए./ एच. एस. जी. (टी. सी.)/ २२५/२०१०-११
एम. एम. आर. डी. ए., कॉम्प्लेक्स, के-६/०२, स्टेशन रोड, कांजूरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

दिनांक : १४/०८/२०२५
वरील सोसायटीच्या वतीने लिहून देण्यात येते की, आमच्या सोसायटीचे रहिवाशी कै. चांद शर्फुदिन शेख यांचे दिनांक १३/०९/२०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे वारस श्रीमती नजमा बी. चांद शेख हे आपल्या कुटुंबासोबत राहतात, हे कायम स्वरूपी आमच्या सोसायटीचे रहिवाशी आहेत तरी ही खोली त्यांचे नावे करण्यास काहीही हरकत नाही. तरी रुम नं. १०२ पहिला मजला हा श्रीमती नजमा बी. चांद शेख यांचे नांवे करावा, हि नम्र विनंती.

(शिक्का)
सही/-
न्यु हरि ॐ सहकारी गृहनिर्माण संस्था (रजि.)

**विशालदीप सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई**
५/८५१, बी.एम.सी. कॉलनी, मालवणी पोलीस स्टेशनसमोर, मालवणी, मालाड (प), मुंबई- ४०००९५.

**२४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**विशालदीप सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई** संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची चोवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक २४.०८.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.** हर्ष क्लासिक बँक्वेट हॉल, प्लॉट नं.९१अ, तुलसी विहार हॉटेल समोर, सेक्टर नं.१, चारकोप इंडस्ट्रीयल इस्टेट, कांदिवली (प), मुंबई-४०००६७ या ठिकाणी खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

❖ सभेपुढील विषय ❖

१) दि. २२/०९/२०२४ रोजी झालेल्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचून मंजूर करणे.
२) दि. ३१/०३/२०२५ अखेर संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) सन २०२४-२०२५ या सालाचा अंतर्गत लेखा परीक्षकांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
४) सन २०२४-२०२५ या सालाचा वैधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
५) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२४-२०२५ सालच्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
६) सन २०२५-२०२६ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीस व कर हिशोब तपासणीस यांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७) सन २०२५-२०२६ सालाकरिता वैधानिक हिशोब तपासणीस यांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
८) सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखा परीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९) सन २०२५-२०२६ सालच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे व सन २०२४-२०२५ सालाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजुरी देणे.
१०) संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
११) संस्थेच्या स्वमालकीच्या जागा खरेदी करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
१२) वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३) संचालक मंडळाने मंजुर केलेल्या कर्ज, ठेव, गुंतवणूक, प्रशिक्षण व कर्ज वसुली इत्यादी विषयाच्या धोरणास मंजुरी देणे.
१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १० ऑगस्ट २०२५
संचालक मंडळाच्या संमतीने
सही/-
विश्वास शिवाजी केसरकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सूचना**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२) कोणत्याही सभासदास काही सुचना करावयाच्या असल्यास सभेच्या दिनांकापूर्वी पाच दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सुचना सादर कराव्यात. ऐनवेळी आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही.
३) ज्या सभासदांनी लाभांश घेतला नसेल तो त्यांनी त्वरीत घेऊन जावे अन्यथा तीन वर्षावरील लाभांश राखीव निधीमध्ये वर्ग केला जातो.
४) ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नसतील अशा सभासदांनी आपले भाग दाखले संस्थेच्या मुख्य कार्यालयातून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत घेऊन जावेत.
५) सर्व सभासदांना सुचित करण्यात येते कि, के.वाय.सी (KYC) बाबतच्या कागदपत्रांची पुर्तता करणे व आपल्या राहण्याच्या व कामाच्या पत्त्यातील बदलासंबंधी तसेच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी बदला संबंधी माहिती संस्थेस लेखी कळविण्यात यावी.

संचालक मंडळ

**सार्वजनिक सूचना**
**परिशिष्ट - १६ नुसार**
**(सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या उपविधी क्र. ३४ अंतर्गत)**

**श्री. जगदीश नारायण सावंत** हे **जीवदानी कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत** चे मुळ सदस्य होते जिचा पत्ता श्री वल्लभ रोड, ३०१ बस स्टॉप जवळ, हनुमान टेकडी, अशोकवन, बोरीवली (पू), मुंबई – ४०० ०६६ आणि सदर सोसायटीच्या बिल्डींग मधील ४ थ्या मजल्यावर असलेल्या **फ्लॅट क्र. ४०१**, (क्षेत्रफळ ३७० चौ. फूट बिल्ट उप म्हणजेच २१ चौ. मी. म्हणजेच २२६ चौ फूट कार्पेट) व सदर फ्लॅट ला जोडून असलेले ४ थ्या मजल्यावर असलेले टेरेस चे मालक होते. (येथून पुढे **"सदरचा फ्लॅट"** असे संबोधले जाईल).

तद्नंतर, **श्री. जगदीश नारायण सावंत** ह्यांचे दिनांक १७/०३/२००० रोजी निधन झाले व सोसायटी ने श्रीमती रेखा जगदीश सावंत यांच्या नावे सदरचा **फ्लॅट क्र. ४०१** त्यांच्या नावे दि. ०३/०४/२०१३ रोजी केला.

तद्नंतर, **श्रीमती. रेखा जगदीश सावंत** ह्यांचे दिनांक २२/०६/२०२१ रोजी निधन झाले. मयत **श्रीमती. रेखा जगदीश सावंत** यांच्या पश्चात त्यांची मुलगी **(१) कु. श्वेता जगदीश सावंत** आणि त्यांचा मुलगा **(२) श्री. स्वप्निल जगदीश सावंत** हेच त्यांच्या फक्त कायदेशीर वारसदार आहेत.

तद्नंतर, **श्वेता जगदीश सावंत** यांनी त्यांना वारसाने आलेले त्यांचे सदर फ्लॅट मधील ५०% हक्क, शीर्षक, भाग आणि अधिकार दिनांक ११/०८/२०२५ रोजीच्या हक्कसोड पत्र द्वारे **श्री. स्वप्निल जगदीश सावंत** यांच्या नावे सोडून दिलेले आहे आणि सदरचे हक्कसोड पत्र योग्यरित्या नोंदणीकृत केलेले असून त्याचा नोंदणी क्र. मबई१२-१४३९५-२०२५ असा आहे.

आता, **श्री. स्वप्निल जगदीश सावंत** यांनी सदर फ्लॅट आणि शेअर्स मधील हक्क, शीर्षक, भाग आणि अधिकार त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला आहे. सोसायटी याद्वारे इतर वारस किंवा कायदेशीर वारस किंवा इतर दावेदार/आक्षेप घेणार्‍यांकडून **१४ (चौदा)** दिवसांच्या कालावधीत सदर नोटीसचे प्रकाशन झाल्यापासून सोसायटीच्या भांडवली/ मालमत्तेतील मृत सदस्याचे उक्त शेअर्स आणि हक्क हस्तांतरित करण्यासाठी दावे किंवा आक्षेप आमंत्रित करते. सदरच्या दावेदारांनी दाव्याच्या/ आक्षेपांच्या समर्थनार्थ आणि सोसायटीच्या हक्काच्या मालमत्तेतील मृत सदस्याच्या हक्क हस्तांतरणासाठी त्यांच्याजवळ असलेले कागदपत्रांच्या प्रती आणि इतर पुराव्यांसह संस्थेला कळवावे. वरील विहित कालावधीत कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटीच्या उपनिधीनुसार प्रदान केल्याप्रमाणे सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सदस्याचे शेअर्स आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास सोसायटी मुक्त असेल.

ठिकाण : मुंबई दिनांक : १५/०८/२०२५
**जीवदानी कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत**
सही/-
**अध्यक्ष/सचिव**
श्री वल्लभ रोड, ३०१ बस स्टॉप जवळ, हनुमान टेकडी, अशोकवन, बोरीवली (पू), मुंबई – ४०० ०६६.

**SBI-SG**
One Stop Solution For All Investments
**SBI-SG GLOBAL SECURITES SERVICES PVT LTD,**
B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building,
SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India

**TENDER NOTICE**

Chief Financial Officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India invites sealed bids from eligible bidders to meet the requirement for the development and procurement of a comprehensive software solution to convert financial SWIFT messages starting with 1,2 and 9 from existing MT format to ISO 20022 as per requirement mentioned in RFP number SBISGGSS/Custody/25-26/410. The complete set of bidding documents can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/** "TENDER" section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before 22-08-2025 by 11:30 pm at our registered office

Sd/-
(Amitav Kar)
Chief Financial Officer

# सचिन तेंडुलकरच्या पुत्राचा साखरपुडा संपन्न

**मुंबई** - भारताचा दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा २५ वर्षांचा मुलगा क्रिकेटपटू अर्जुन तेंडुलकर याचा साखरपुडा सानिया चंडोक हिच्याशी नुकताच पार पडला. सानिया ही मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक रवी घई यांची नात आहे. हा साखरपुडा अत्यंत खासगी आणि पारंपरिक पद्धतीने, कुटुंबातील काही निवडक व्यक्तींच्या उपस्थितीत पार पडल्याची माहिती आहे. ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी ग्रुपचे अध्यक्ष रवी घई यांची सानिया नात आहे. घई कुटुंबाचे मुंबईत इंटरकॉन्टिनेंटल मरीन ड्राईव्ह हॉटेल, हेल्दी आईसक्रीम ब्रँड ब्रुकलिन क्रीमरीसह आंतरराष्ट्रीय व्यवसाय आहेत. सानिया या मिस्टर पॉज पेट स्पा अँड स्टोअर एलएलपी या पाळीव प्राण्यांच्या सेवा केंद्राच्या संचालिका आहेत.





जिजामाता नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ
( जिजामाता नगरचा राजा काळाचौकी )



मुंबई एकता मंडळ

## निवडणूक आयोगाचा कारनामा!
# संन्याशाच्या पोटी पन्नास मुले

■ वाराणसी

**निवडणूक** आयोगाकडून मतदार याद्यांमध्ये घोळ केला जात असल्याच्या तक्रारी येत असताना त्याच्या नवनवीन सुरसकथा सध्या उघड होत आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी कर्नाटकमधील घोळ चव्हाट्यावर मांडल्यानंतर आता उत्तर प्रदेशच्या वाराणसीमधून असाच एक धक्कादायक घोळ समोर आला आहे. येथील सुप्रसिध्द राम जानकी मंदिराचे संस्थापक स्वामी रामकमल दास ज्यांनी बालपणापासून ब्रह्मचर्य व्रताचे पालन केले आहे त्यांची ५० मुलांचे पिता अशी नोंद मतदार यादीमध्ये करण्यात आली आहे. ही नाव नोंदणी अधिकृत नाही तरी तिचा स्वीकार कसा केला हा प्रश्न आहे.

» पान ७ वर

# धारावीत अपात्र वस्त्र उद्योगांना भाडेतत्त्वावर गाळे देण्याचा निर्णय


■ मुंबई

**धारावीतील** झोपडपट्टीचा पुनर्विकास सुरू आहे. याठिकाणी अन्य उद्योगांसोबतच वस्त्र कारागिरही मोठ्या प्रमाणावर आहेत. परंतु त्यांचे गाळे वरच्या मजल्यावर असल्याने त्यांच्या पुनर्वसनात अडथळा येत होता. मात्र आता राज्य सरकारने यावर तोडगा काढला आहे. सरकारच्या नव्या धोरणामुळे अशा व्यावसायिकांनाही धारावीतच भाडेतत्त्वावर गाळे देण्यात

### वस्त्र कारागिरांना लाभ

येणार आहेत, अशी माहिती धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास म्हणाले की, धारावीतील पुनर्वसन इमारतींमध्ये राखीव असलेल्या १० टक्के व्यावसायिक जागांमध्ये भाडेतत्वावर व्यवसाय सुरू ठेवण्यास पात्र नसलेल्या अशा व्यावसायिकांनाही परवानगी मिळणार आहे. धारावीत सध्या सुमारे ३,५०० वस्त्र उद्योग असून, त्यातून मोठ्या, मध्यम आणि लहान आकाराच्या उद्योगांमध्ये एकूण ३० हजारहून अधिक कामगार कार्यरत आहेत. या उद्योगांपैकी जवळपास ७० टक्के उद्योग भाडेतत्वावर सुरू आहेत.




## राज कुंद्रा-शिल्पा शेट्टी अडचणीत
# ६० कोटींच्या फसवणुकीचा गुन्हा

■ मुंबई

**बॉलिवूड** अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचे पती राज कुंद्रा यांच्या विरोधात तब्बल ६०.४८ कोटी



रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा मुंबईतील जुहू पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. या प्रकरणात एका अज्ञात व्यक्तीचाही समावेश असून, आर्थिक गुन्हे शाखेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तक्रारदार उद्योगपती दीपक कोठारी यांनी आरोप केला आहे की, २०१५ ते २०२३ दरम्यान व्यवसाय विस्ताराच्या नावाखाली शिल्पा आणि राज यांनी त्यांच्याकडून ६०.४८ कोटी रुपये घेतले. मात्र हे पैसे वैयक्तिक खर्चासाठी वापरले. हा व्यवहार शिल्पा आणि राज यांच्या आता बंद पडलेल्या बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्मसाठी कर्ज व गुंतवणूक कराराशी संबंधित होता. शिल्पा आणि राज कुंद्रा यांचे वकील प्रशांत पाटील यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, ऑक्टोबर २०२४ मध्ये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने या प्रकरणावर आधीच निर्णय दिला आहे.

# सतिश जाधव यांना राष्ट्रपती पदक जाहीर

■ मुंबई



**घाटकोपर** पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले सतिश भगवान जाधव यांना गुणवत्तापूर्वक सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे.

मुंबई, अमरावती, नवी मुंबई, ठाणे, विशेष सुरक्षा विभाग यासह विविध ठिकाणी आपल्या कर्तव्य आणि सेवेतून पोलीस दलाला अभिमानाने मान उंचावण्यासाठी केलेल्या विविध कामांची दखल घेत पोलीस दलाकडून त्यांना २०२२ साली महासंचालकांच्या पोलीस पदकाने गौरविण्यात आले होते. आता त्यांच्या कामाची दखल घेत शासनाकडून त्यांना राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

## तानाजी सावंताच्या मुलाच्या
# अपहरणाची फाईल बंद

■ मुंबई

**शिवसेनेचे** आमदार आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांनी फेब्रुवारी महिन्यात मुलगा ऋषिराज याचे अपहरण झाल्याची तक्रार सिंहगड पोलीस ठाण्यात दाखल केली होती. मात्र तपासात हे प्रकरण गैरसमजाचे असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात पोलिसांनी न्यायालयात बी फायनल रिपोर्ट सादर करून अपहरणाची फाईल बंद केली आहे.

१० फेब्रुवारी रोजी तानाजी सावंत यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ऋषिराज हा अचानक बेपत्ता झाला. त्याच्या कार चालकाने त्यांना पुणे विमानतळावर सोडल्याचे सांगितले होते. त्यावेळी ऋषिराज सोबत त्यांचे काही मित्र होते. त्यामुळे मित्रांनीच त्यांचे अपहरण केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

पोलिसांनी तातडीने विमान वाहतूक मंत्रालयाशी संपर्क साधून देशाबाहेर जाण्याआधीच ऋषिराज यांचे चार्टर्ड विमान पुणे विमानतळावर परत बोलावले. पण चौकशीत समोर आले की, त्यांचे अपहरण झाले नव्हते. त्यांनी कोणालाही न सांगता खासगी कामानिमित्त बँकॉकला जाण्याचा निर्णय घेतला होता. घटनेनंतर पाच महिन्यांनी, तपास पूर्ण करून सिंहगड पोलिसांनी न्यायालयात बी फायनल रिपोर्ट सादर केला आहे. या प्रकरणात कोणतेही गुन्हेगारी स्वरूप नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

